श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष ११ अंक ९-१०] कार्तिक-मार्गशीर्ष [ श. १८५६

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड

# अनुक्रमणिका

| | | पृष्ठे |
|---|---|---|
| १ | कांहीं आध्यात्मिक अनुभव ... ... ... ... | १–७ |
| २ | श्रीरामकृष्ण–उपदेशामृत ... ... ... ... | ७–८ |
| ३ | अनुभव ... ... ... ... ... ... | ९–१३ |
| ४ | ऑक्टोबर १९३४ चें शिर्डीवृत्त ... ... ... | १४–२१ |
| ५ | नोव्हेंबर १९३४ चें शिर्डीवृत्त ... ... ... ... | २२–२४ |
| ६ | कै. भक्तशिरोमणि श्रीम्हाळसापति ... ... ... | २५–६४ |

## विनंति

वर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे कीं, या सालीं V. P. करण्यांत आली नसल्यामुळें ज्यांनीं वर्गणी अद्यापि पाठविली नाहीं, त्यांनीं कृपा करून ती खालील पत्त्यावर पाठवून द्यावी. अथवा V. P. करण्याचें सुचवावें.

रा. आ. तर्खड,
व्यवस्थापक—श्रीसाईलीला
५१ E, पार्ली रोड, खार, मुंबई २१; आणि ऑ. खजिनदार,
श्रीसाईबाबा शिरडी संस्थान

## कै. श्रीम्हाळसापति अंक

श्रीसाईसद्भक्तांच्या सोयीसाठीं या अंकावरून कै. म्हाळसापति अंक वेगळा प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. किंमत ३ आणे. तरी जिज्ञासूंनीं त्याप्रमाणें मागणी करावी, ही विनंती.

रा. आ. तर्खड,
व्यवस्थापक—श्रीसाईलीला कचेरी

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमच्याकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. तर्खड,
— प्रकाशक

# काहीं अध्यात्मिक अनुभव

( 'कल्याण' हिंदी मासिकावरून )

अनुवादकः—" वासुदेव "

आत्मोन्नतिसाठीं आपलें घरदार सोडून रानावनांत जाण्याची आत्म-

## वर्गणीदारांस विनंती

ज्यांनीं आज १० अंक निघाले तरी श्रीसाईलीलेची वर्गणी अचाप पाठविली नाहीं, त्यांनीं रु. ३—६—० ची रक्कम मनिऑर्डर करून पाठवावी. वर्गणी न आल्यास पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जाईल.

**सुंदरराव दि. नवलकर,**
ऑ. चिटणस,
**शिर्डी संस्थान कमिटी।**

विजय प्राप्त करूं शकतें.

जीव शुभ कर्में आचरीत राहिल्यास तीच पुढील आयुष्यांत शुभ-कर्मपरायण वृत्ति उत्पन्न करीत असतात, आणि अशुभकर्में दूषित वृत्तींना जन्म देत असतात. म्हणून आत्मकल्याणाची अभिलाषा करणाऱ्या पुरुषानें नेहमीं शुभवृत्तींत राहण्याचा उद्योग केला पाहिजे; नाहीं तर आगामी पर-मार्ग-युद्धांत जबरदस्त बाधा उत्पन्न होतील.

कित्येक लोक इतक्यावर संतोष मानून घेत असतात कीं, आपला वर्तमान-जीवन-व्यवहार निष्कलंक आहे, आपण कोणाचा छळ करीत नाहीं, नेहमी सन्मार्गानें चालत असतों, ह्याकरितां भगवद्भजनादि कृत्यांमध्यें वेळ खर्च करण्याचें कांहीं कारण नाहीं. असा संतोष मानून घेण्यांत एक मोठी चूक होत असते. भगवद्भजन-आराधन इत्यादि आचरण्यानें पुढील आयुष्यांत जीवाच्या होणाऱ्या परम कल्याणाला तो मुकत असतो. मनुष्यमात्रानें जाणलें पाहिजे कीं, विद्यमान जन्मामध्यें आपल्यांत जी सत्प्रवृत्ति दिसते, तो पूर्व जन्मांतील सत्कर्माचा प्रभाव आहे. तो प्रभाव नष्ट झाल्यावर आसुरी वृत्ति उत्पन्न होणें स्वाभाविक होत असते. यासाठीं प्रत्येक मनुष्यानें—मग तो दिव्य वृत्तींनीं पूर्ण कां असेना—निरन्तर भगवद्भजन करणें अवश्य आहे.

पुष्कळ लोक असे असलेले दिसतात कीं, ज्यांच्या आयुष्याचा पूर्वभाग विषयभोग इत्यादींत खर्च झालेला असतो. उत्तर आयुष्यांत झाल्या गोष्टीबद्दल त्यांना पश्चात्ताप होत असतो, व त्यामुळें त्यांना ऊर्वरित आयुष्य भगवद्भजनांत घालविण्याची इच्छा उत्पन्न होते; परंतु आजवर तसें न केल्यामुळें—लज्जावश होऊन—लोक आपली थट्टा करतील, म्हणून भजनपराङ्मुख होत असतात. ह्या समजुतींचे मनुष्य मोठा मूर्खपणा करीत असतात. परमार्थसाधनांत लाज बाळगणें हा मोठाच दोष आहे; तो आपल्या मानवजीवनाची मोठी हानि करतो व पूर्वीच्या दुष्कर्मामुळें अधोगतीला प्राप्त होत असतो.

## पुनर्जन्मसिद्धि

आपल्या सनातन वैदिक धर्मांत जीवाला पुनर्जन्म असल्याचा सिद्धांत सर्वमान्य आहे. त्रिकालज्ञ योगप्रभावी ऋषींनीं फार प्राचीन काळीं ह्या सिद्धान्ताची घोषणा केली आहे. उपनिषदादि धर्मग्रंथांतून पुनर्जन्मासंबंधीं फार सूक्ष्म रीतीनें निर्णय केलेला आहे. मरणसमयीं स्थूल देहांतून

काय निघून जातें आणि कोठें जातें, तसेंच मातेच्या उदरीं पिंड असतांना किंवा त्याच्या जननसमयीं त्यांत, काय येऊन प्रवेश करतें, हें जाणणें अत्यंत महत्त्वाचें असून फार गूढ आहे. ऋग्वेदाच्या आठव्या अष्टकांतील " यत्ते यमं वैवस्वतं मनो जगाम०, यत्ते दिवं यत्पृथिवी०" इत्यादि मंत्रावरून त्याचा निर्णय होतो. वैदिक धर्माशिवाय इतर धर्म-पंथांमध्यें पुनर्जन्मासंबंधीं मीमांसा केलेली दिसत नाहीं. किंबहुना त्या धर्मपंथांना पुनर्जन्म मान्य नाहीं असेंच दिसून येतें. अलीकडे स्पिरिच्युअॅलिझम् मेस्मेरिझम् अशा शास्त्रांचा पाश्चात्यांनीं शोध लावल्यामुळें, आतां मात्र तिकडील कांहीं लोक पुनर्जन्म मानूं लागले आहेत. आपल्या देशांत पुनर्जन्माची सिद्धता पटविणारीं अशीं प्रत्यक्ष व संशयातीत उदाहरणें प्रसंगवशात् गेल्या कांहीं वर्षांत आढळून आलीं असून, पूर्वीं निरनिराळ्या ठिकाणीं तीं प्रसिद्धही झालीं आहेत. त्यांतील कांहीं श्रीसाईलीलेच्या वाचकांसाठीं पुढें देतों.

( १ ) आठ-नऊ वर्षांपूर्वीची गोष्ट. *बिना-इटावा नांवाच्या गांवीं **प्यारे काछी** नांवाचा शेतकरी ( कुणबी ) रहात होता. त्याचे ( १ ) मरदन, ( २ ) कलुआ, आणि ( ३ ) हल्का या नांवाचे तीन पुत्र आज हयात असून, ते भाजी-पाला विकून आपला उदरनिर्वाह करीत आहेत. त्यांचा बाप प्यारे काछी आजारी पडून निवर्तला. त्यानें खुरई नांवाच्या तहसिलीच्या गांवीं **जानकी असाटी** ह्या वैश्य जातीच्या गृहस्थाच्या घरीं पुत्ररूपानें जन्म घेतला. भगवत्कृपेनें जानकी असाटींच्या घरीं संतति आणि संपत्ति वैपुल्यानें वास करीत आहेत. हे वैश्य गृहस्थ नैष्ठिक वैष्णव असून, प्रतिवर्षी अन्नसंतर्पणादि धार्मिक कृत्यांत बराच खर्च करीत असतात. त्यांनीं या नव्या मुलाचें **बालमुकुंद** असें नांव ठेविलें. हा मुलगा साधारण बोलूं लागल्यावर, फार करून " कलुआ " व " हल्का "

---

* सेंट्रल इन्डियामधील जी. आय. पी. रेल्वे जंक्शनचा गांव.

ह्यांचीं नावें घेऊन आपल्या पूर्वजन्मींच्या घराची आठवण काढूं लागला. त्यावरून घरांतील मंडळीला व ज्यांनीं ही माहिती ऐकिली होती, त्या बाहेरच्या मंडळीला यांतील सत्य समजून घेण्याची इच्छा उत्पन्न झाली. एके दिवशीं जानकी प्रसादी कांहीं मंडळीसहित त्या मुलाला घेऊन बिना-इटावा गांवीं गेला. मुलगा गांवघस्तींत आल्यावर थेट आपल्या ( पूर्व-जन्मींच्या ) घरीं धांवत गेला. बाप व इतर लोक घरांतच होते. बापानें बालमुकुंदास सांगितलें कीं, " आपल्या मुलांना हाक मारून बोलाव. " तो मुलगा मरदन, कलुआ, हल्का हीं नावें जोरजोरानें उच्चारूं लागला. तें ऐकून घरांतील स्त्रियाही बाहेर आल्या. त्यांना पाहून मुलगा फार आनंदित झाला. त्या घरांत एका जागीं त्यानें ( पूर्वजन्मीं ) कांहीं द्रव्य पुरून ठेविलें होतें, ती जागा त्या स्त्रियांना दाखवून सांगितलें कीं, ह्या ठिकाणीं मीं गाडून ठेविलेलें द्रव्य आहे तें काढून त्या व आपल्या घर-संसाराला खर्च करा.

प्यारे काछी जातीचा कुणबी असूनही स्वभावानें विनयशील व सरल वृत्तीचा गृहस्थ होता; तो आमरणान्त सर्वांशीं मित्रभावानें वागला. आपल्या निढळाच्या घामानें कमाई करून त्यानें आपल्या कुटुंबाचें पालन-पोषण केलें होतें. अशा सत्त्वशील मनुष्याला सुसंपन्न अशा एका नैष्ठिक वैष्णव कुलांत पुढील जन्म प्राप्त झाला; त्यावरून शुभ कर्माचरणीं मनु-ष्याला उत्तरोत्तर उच्च गति प्राप्त होते, ही गोष्ट सिद्ध होते; आणि अशुभ कर्माचरणी मनुष्याला त्याच्या उलट, म्हणजे नीच स्थिति व गति प्राप्त होईल हें निराळें सांगावयास नकोच. आतां बालमुकुंद पूर्वजन्मींची स्मृति विसरून गेला आहे.

( २ ) खुरई तहसीलमधील लाखनखेरा नांवाच्या गांवीं धारुसिंह नांवाचा एक किसान ( कुणबी ) राहतो. त्याला एक मुलगा झाला, तेव्हां त्याच्या जांवेत एक फोड दिसूं लागला. मुलाला त्यापासून वेदना होऊं

लागल्यावरून त्याच गांवचे भवानी नेमा या देशी वैद्यांकडून मलम आणून त्यावर लावूं लागले. थोडया दिवसांनी मुलाला त्यापासून आराम वाटूं लागला. मुलाचें नांव 'रघुवर' ठेवण्यांत आलें. सध्या त्याचें वय सुमारें दहा वर्षांचें आहे. एके दिवशीं गालभीन येथील कन्छेदी नांवाचा लढिया ( लहानसा संस्थानिक ) लाखनखेरा गांवीं आला. रघुवरची दृष्टि लढियावर पडतांच तो म्हणाला कीं, " हा लढिया माझा मागील जन्माचा शत्रु आहे, यानें माझ्या जांघेंत गोळी मारली होती. " कन्छेदीला हें ऐकून प्रथम आश्चर्य वाटलें. परंतु मुलगा पुनः पुनः तेंच सांगूं लागल्यावरून कन्छेदीला आठवण झाली व तो म्हणाला कीं, " कोरवाई रियासतींतील बरखेडा नांवाच्या गांवीं एकदा दरोडा पडला होता, त्या वेळीं डाकू लोकांवर आपण बंदुकांच्या गोळ्या मारल्या होत्या, त्यांतील एका डाकूच्या जांघेंत गोळी लागल्याचें मला स्मरतें." त्या मुलानें आपलें पूर्वजन्मींचें नांव सांगितलें नाहीं.

( ३ ) बीना-इटावा या गांवीं लालजूप्रसाद यादव या नांवाचे गृहस्थ हिन्दी मिडल्स्कूलचे हेडमास्तर आहेत. त्यांच्या बायकोच्या गळ्यांत गण्डमाळेचा (Scrofula) रोग उत्पन्न झाला. त्यांनीं आयुर्वेदिक आणि ॲलोपाथिक अशा दोन्ही औषधांचे अनेक उपचार केले, परंतु रोगावर कांहींच परिणाम झाला नाहीं. शेवटीं त्यांना कोणी सांगितलें कीं,* जरुआ नांवाच्या खेड्यांतील एक मनुष्य या रोगावर झाड करून रोगी बरा करतो. त्यावरून कुटुंबाला घेऊन ते जरुआ गांवीं गेले. झाड करणाऱ्यानें एक मडकें व कांशाची थाळी मागून घेतली, आणि लांकडी पाटावर मनुष्याची आकृति काढून त्यांच्यासमोर त्या रोगी बाईला बसवून प्रयोग करण्यास सुरवात केली. प्रयोग चालू असतां तो रामायणांतील कांहीं पदें गात असे. त्याचें हें गायन चालू असतांना मडक्यावर ठेवलेली थाळी मडक्यावरून आपोआप वर उचलत असे. असें कांहीं दिवस चाललें

* जरुआ हा गांव बिना जंक्शनपासून २४ मैल लांब असून बिना-कटनी लाईनवर रेल्वेस्टेशन आहे.

होतें. तरी त्या बाईच्या रोगावर कांहींच परिणाम झाल्याचें दिसून येईना. पुढें ती बाई बेहोष होऊं लागली. त्या स्थितींत असतां ती आपलें डोकें चारही बाजूंना हालवीत असे. पण तिला बोलतां येत नसे. मांत्रिकाचे प्रयोग संपल्यावर ती शुद्धीवर येई. त्या वेळीं लालजूप्रसाद हे तिला विचारीत कीं, " तुला काय वाटत होतें, व काय होत होतें, तें सांग. " त्यावर ती एकच उत्तर देई कीं, " मला एकाएकीं बेशुद्धि प्राप्त होते. त्या प्रसंगीं कसचीच आठवण राहत नाहीं. " मांत्रिक त्यामुळें हताश झाले नाहींत. त्यानें सांगितलें कीं, तशा स्थितींत असतांना रोगी अवश्य बोलूं लागेल. परंतु त्याला कांहीं दिवस लागतील. करितां तुम्हीं एक महिन्याच्या रजेची व्यवस्था करा. लालजूप्रसाद यांनीं रजा घेतली. त्या मुदतींत बाईचा रोग क्रमक्रमानें क्षीण होत जाऊं लागला होता. बरोबर सतराव्या दिवशीं बाईच्या बेशुद्धीचें रूप बदललें. तिच्या देहांत प्रवेशून जो जीव तिला सदरील रोगानें दुःख देत होता, तो त्या दिवशीं तिच्या मुखावाटे बोलला कीं, " मीं या स्त्रीचा प्राण घेतल्यावरच तिच्या देहांतून निघून जाईन. " त्यावर त्याला अनेक तऱ्हांनीं विनवून सांगण्यांत आलें. त्यावरून त्या जीवात्म्यानें अशी गोष्ट सांगितली, " पूर्वजन्मीं ही मुलगी भेल* येथील एक ब्राह्मणी होती. तिचें नांव " मुक्ता " असें होतें. इला कांहीं मुलगे होते. **मीं सर्प आहें.** भेलसा गांवांत माझा एक चवुतरा आहे व तो ठाकुरबाबाच्या नांवानें प्रसिद्ध आहे. एके दिवशीं या ब्राह्मणीच्या घरांत जाऊन दुधाच्या आशेनें मी इकडे तिकडे फिरत होतों. बाई दूध विरजणास लावण्यासाठीं आली, त्या ठिकाणीं तिनें मला पाहिलें. हें समजतांच मीं लहानशा एका बिळांत प्रवेश केला. बाईनें आपल्या मुलांना त्या जागेची माहिती सांगितल्यावर तिच्या मुलांनीं त्यांत काठ्या

---

* " भेलसा " हें ग्वाल्हेर संस्थानांत, जी. आय्. पी. रेल्वेच्या स्टेशनचें गांव आहे. बाणभट्टाच्या कादंबरींत " विदिशा " म्हणून ज्याचें वर्णन आहे तेंच भेलसा होय

" -वासुदेव "

घालघालून मला घायाळ केलें. शेवटीं हताश होऊन प्राणरक्षणासाठीं मीं गवताच्या एका गड्ड्यांत जाऊन राहिलों. त्याला या बाईनें आग लावून दिली; तींत जळून मला मृत्यु आला.'' लोकांनीं परोपरीनें त्याला विनवून सांगितलें कीं, आतां कृपा करून या बाईला तूं सोडून जा, म्हणजे मी रोगमुक्त होईन. तसें केल्यास साठ गरीब ब्राह्मणांस तिच्या हातून भोजन देवूं. ह्यावर सर्पानें वचन दिलें कीं, ''बरें तर, मी या स्त्रीला आतांच सोडून जातों.'' त्या दिवशींच तिच्या गळ्यांतील सर्व ग्रंथी सुकून गेल्याचें दिसून आलें. सर्पानें सांगितलेल्या पूर्ववृत्तांताची खात्री करण्यासाठीं तिचा नवरा स्वतः भोरसा गांवीं गेला व त्या ठिकाणचा चवुतरा पाहिला. ब्राह्मणीचें घरही त्यानें शोधून काढलें; परंतु त्यांत आतां कोणी राहिलें नव्हतें.

आमच्या मंत्रांत सामर्थ्यच नाहीं, अशा वल्गना करणारांनीं वरील गोष्ट विचारांत घेण्यासारखी आहे.

# श्रीरामकृष्ण-उपदेशामृत

## कांहीं तात्त्विक बोल

१ शेवाळीनें अच्छादिलेल्या पुष्करिणीच्या कडेवर उभा राहून कोणी '' ह्या तळ्यांत पाणीच दिसत नाहीं '' असें म्हणेल. ज्याला पाणी पाहावयाचें असेल, त्यानें शेवाळीला दूर केल्यावरच तें दिसून येणार. तद्वत् मायेनें आच्छादित झालेल्या नेत्रांनीं बाह्य सृष्टीकडे पाहून '' आम्हांस यांत ईश्वर दिसत नाहीं, '' असें म्हणणाऱ्यांना ईश्वर पाहावयाचा असेल तर मायेचा पडदा हटविला पाहिजे.

२ मेघांनीं सूर्यबिंब जसें आच्छादिलें जातें, तद्वत मायाही ईश्वराला आच्छादून टाकीत असते. मेघ पलीकडे होतांच सूर्यबिंब जसें स्पष्ट दिसतें. तसेंच मायेचें पटल दूर होतांच ईश्वरदर्शन होत असतें.

३ ईश्वर सर्वव्यापी आहे, तो व्याघ्रासारख्या क्रूर श्वापदामध्येंही आहे, ही गोष्ट खरी; परंतु वाघाच्या निकट जाणें मात्र उचित नव्हे. त्याचप्रमाणें दुष्ट वृत्तीच्या मनुष्यामध्येंही ईश्वर आहे, पण त्याची संगत करणें उचित नव्हे.

४ परिस मण्याच्या स्पर्शानें लोखंडाची तलवार सुवर्णाची होते, परंतु तिच्या बनावटींत कांहीं फरक होत नसतो. ती आतां सोन्याची बनल्यामुळें तिच्याकडून हिंसाकर्म होऊं शकणार नाहीं. ठीक, त्याचप्रमाणें भगवद्दर्शन झालेल्या मनुष्याचा आकार आहे तसाच राहतो, त्यांत कांहीं बदल होत नसतो; परंतु त्याच्या हातून कोणचेंही अन्य कार्य होणें शक्य नसतें.

५ हंसाच्या चोचींत एक प्रकारचा रस असतो, त्या रसाच्या द्वारें तो जलमिश्रित दुधांतून जल आणि दूध अलग-अलग करीत असतो; दुसऱ्या पक्षांकडून हें होणें शक्य नसतें. तद्वत मायामिश्रित ईश्वराला—मायेला हटवून—दुसऱ्या लोकांना पाहतां येणें शक्य नसतें. जे परमहंस आहेत, तेच मायेला पलीकडे करून ईश्वरदर्शन घेऊं शकतात.

६ एक डुबकी मारून रत्न हातीं लागलें नाहीं, म्हणून समुद्राला रत्नहीन मानूं नको. बुडया मारतां मारतां रत्न हातीं लागेलच. थोडयाशा साधनानें " ईश्वर प्राप्त होत नाहीं " असें मानून हताश होऊं नको; धैर्यपूर्वक साधन चालू ठेव; यथासमय तुझ्यावर ईश्वरी कृपा होईल.

" क्रमशः "

# अनुभव

कृ. सा. न. वि. वि. माझे तीन अनुभव प्रसिद्धीकरितां सेवेशीं पाठविले आहेत. सेवेशीं श्रुत होय, हे विज्ञापना.

आपला,

दामोदर भगवंत रामपूरकर

लेकुराचें हित, जाणे माउलीचें चित्त ॥
ऐशी कळवळ्याची जाती, करी लाभावीण प्रिती ॥
पोटीं भार वाहे, त्याचें सर्वस्वही साहे ॥
तुका म्हणे माझें तुम्हां संतांवरी ओझें ॥

कृ. सा. न. वि. वि.— सन इसवी १९२८ ची गोष्ट. मी जीरापुरास असतांना मुलगी जावाई मुलांबाळासह जवळपुराहून भेटीस यावयाची असल्यानें तयारीस लागले व त्याच वेळीं मुलीस ज्वर आला. पण माहेरीं जावयाचें, व अशा वेळीं ज्वर आल्याचें जर कळलें, तर जाणें थांबेल. म्हणून कोणास न सांगतां तसेच प्रवासास निघाले. दीड दिवस रेल्वेप्रवास व साठ मैल मोटरचा अति त्रासदायक प्रवास, यामुळें ज्वरानें उग्र रूप धारण केलें. तरी कोठेंही न थांबतां तशा स्थितींत दुसऱ्या दिवशीं रात्रीं १० वाजतां जीरापुरास घरीं येऊन पोहचलें. त्या वेळीं प्रकृति ज्वरामुळें बरीच विकोपास गेलेली दिसली; म्हणजे रात्रभर तिला शुद्धिच नव्हती. कारण ज्वर पांच डिग्रीवर होता. तिची लहान मुलगी तिलाही बराच ज्वर होता. परंतु तिजकडे इतकें लक्ष देण्यास वेळच झाला नाहीं. सकाळीं वैद्य आले. पण ज्वर कमी झाल्याशिवाय ते औषध देण्यास तयार होईनात. दुपारीं दोनअडीच झाले, तेव्हां स्नान, जेवण करून त्यांचें पूजन उठलों. त्या वेळीं मुलगा आणखी त्या बहिणीजवळ बसला होता. त्याला काय वाटलें कोणास ठाऊक, मी गेल्यावर त्यानें श्रीसाईबाबांची उदी घेऊन बहिणीस लाविली. बाबांचा फोटो तिच्या उशागतीं ठेविला व श्रीसाईलीलामासिक घेऊन अनुभव वाचूं लागला. ३॥ वाजतां मी पूजा आटोपून बाहेर आलों, तों मुलीचें बोलणें ऐकूं आलें. मनाला एकदम

धक्का बसला. वाटलें, वाताचा जोर जाहला की काय ? धांवतच जवळ जाऊन पाहतों, तों मुलगी उठून बसली होती व दोघेंही बहिणभाऊ बाबांच्या गोष्टी सांगत होतीं. मला पाहतांच मुलीनें विचारलें, साईबाबा कोण ? कुठें असतात ? तुम्हाला कसे कळलें, वगैरे बरेच एकामागून एक प्रश्न केले व मीही तिला उत्तरें देत होतों, व ज्वरही पाहत होतों. त्या वेळीं ज्वर ९९ होता. मी मुलाला विचारलें, हिला बरें केव्हां वाटलें ? त्यानें सांगितलें, तुम्ही गेल्यावर मला एकदम आठवण झाली, म्हणून मी उदी लाविली व फोटो ठेवला व अंक घेऊन वाचूं लागलों. अर्धें पान वाचून झाल्यावर इनें डोळे उघडले व विचारलें, "तूं काय वाचतोस ?" तेव्हां मी इला पुन्हा अनुभव वाचून दाखविला. तो संपतांच ही उठून बसली व आणखी असेच अनुभव वाच म्हणाली. म्हणून मी इला आणखी ३।४ अनुभव वाचून दाखविले व त्याच गोष्टी बोलत होतों. उदीचा मला अगदींच विसर कसा पडला म्हणून मला बरेंच वाईट वाटलें. सायंकाळीं ज्वर थोडा होता. सकाळीं पाहिलें तों ज्वर अगदीं नव्हता व रात्रीं झोंपही लागली होती. औषधउपचाराचें कामच पडलें नाहीं. लहान मुलीचा ज्वर मात्र तसाच होता. तेव्हां अर्थात् उदीचा प्रयोग करावा लागला. व दोन दिवसांनीं औषधावांचून तिचाही ज्वर गेला. तेव्हांपासून मुलीच्या घरींही श्रीसाईबाबाच्या फोटोची पूजा होऊं लागली. खरीच माउली. लेकराचें हित हे माउलीचें चित्त जाणतें. से. श्रु. हे विज्ञापना.

## अनुभव २

माझी मुलगी जबलपुरास बिमार होती. मी जावरापुरला होतों त्या वेळीं चि. रा. कृष्णराव वामन नाटेकर ( जावई ) यांचें पत्र आलें कीं सौ.वतीची प्रकृती बिमार आहे. नववा महिना संपला; प्रसूति अद्याप झाली नाहीं. सर्वांगावर सूज असून ज्वर आहे. आपली आठवण करिते, तरी भेटीस या. परंतु मला जाण्यास वेळ नसल्यानें पत्र पाठवून खबर विचारली, उत्तर आलें कीं, प्रकृति बिमारच आहे. डॉक्टरचें औषध सुरू आहे.

फिकरींसारखें नाहीं. मला थोडें बरें वाटलें. त्या वेळीं मी जिरापुरास होतों व मुलगा चि. आण्णा इंदूरला होता; त्याला आपल्या बहिणीच्या बिमारीबद्दल कांहींच माहिती नव्हती; परंतु त्याच्या मनानें एकदम इतकी उचल घेतली कीं, जबलपुरला केव्हां जाईन असें झालें ! मला जीरापुरास त्याचे पत्र आलें कीं, शाळेला सुटी आहे, मला येथें अगदीं बरें वाटत नाहीं; जबलपुरास जाऊं काय ? मी त्याला उत्तर लिहिणार होतों कीं, तूर्त जाऊं नको. मी इंदूरला आल्यावर जा. परंतु त्यापूर्वींच तो जबलपुरला गेला. तेथें गेल्यावर प्रकृति जास्त बिमार असल्याचें त्याला वाटतांच त्यानें मला जीरापुरला तार केली कीं, ती. सौ. छोटीताई जास्त बिमार, सत्वर या. झालें चित्त अस्वस्थ ! लगेच दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. ९।७।३३ ला जीरापुर मोटरनें सकाळी ७॥ ला रवाना होऊन सायंकाळीं ५-७ ला इंदूरला आलों व लगेचच्या गाडीनें सायंकाळीं रवाना होऊन ता. १०।७।३३ ला चार वाजतां जबलपुरला पोहचलों. प्रकृति जास्त बिमार होती. जावयांनीं सांगितलें, "प्रसूतीचे दिवस निघून गेले. बिमारीचें वाढतें प्रमाण; औषध आहे. पण उपयोग होईना, म्हणून श्रीसाईबाबांची उदी दिली. तेव्हां चारपांच तासांतच प्रसूति झाली. पण मुलगा गेला." इतक्यांत डॉक्टर आले. इन्जेक्शन् दिलें, दोन तीन प्रकारचीं औषधें, एक एक दोन दोन तासांनीं देण्याचा क्रम सुरू होताच. ७।८ दिवस झाले. बिमारीचा मागें पाय पडेना. यांतच पुढें वाताचा एक दिवस जोर होऊन कठीण प्रसंग आला. त्या वेळीं आम्हां सर्वांचें देहभान नाहींसें होऊन एकदम सर्वांनीं श्रीसाईमाउलीचा धांवा सुरू केला. तिची आई तर "अहो बाबा, अहो बाबा" म्हणून मोठ्यानें हाका मारूं लागली. लगेच मला उदीची आठवण आली, व श्री. रा. रा. तर्खडसाहेब यांनीं ( श्रीसाईबाबांच्या हातची उदी, जपून उपयोग करावा ) म्हणून पाठविलेली उदी जवळ होती, तिचा उपयोग केला. पण काय सांगूं, त्या साईमाउलीची उदी म्हणजे अमृतसंजीवनीच. तीनच मिनिटांत वाताचा वेग नाहींसा होऊन एकदम

तिला शुद्धि आली. डॉक्टरसाहेबांना बोलावणें गेलेंच होतें. त्यांचे उपाय चालूच होते. त्यांना मीं प्रकृतीबद्दल विचारलें कीं, " आपणास काय वाटतें?" त्यांनी सांगितलें, " हल्लीं कांहीं सांगूं शकत नाहीं; उपचार चालू ठेवा." तेव्हांपासून आम्ही त्रिकाल उदीचा उपयोग करूं लागलों, व त्या दिवसापासूनच प्रकृतींत फरक पडूं लागला. तो असा कीं, १५।१६ दिवसांतच अंगावरची सूज, ताप, जुलाब वगैरे सर्व बंद होऊन आपो-आप उठून बसूं लागली व थोडें अन्नही खाऊं लागली. औषध सुरू होतेंच व उदीही सुरू होती. एक महिन्यांत ती चालूं फिरूं लागली. नंतर आम्ही सर्व परत इंदूरला आलों.

जावई नाटेकर, हल्लीं मु. ॥ मह्रू यांनीं नवस केल्याप्रमाणें तेही दर्शनाकरतां शिर्डीस येणार आहेत. पण श्रीसाईसच्चरित अ. ३०, ओवी ४८ ॥ विना आलिया संताच्या मना ॥ कोण जाईल तयाचे दर्शना ॥ आश्चर्य तयांचे सत्तेविना ॥ पान हालेना वृक्षाचें ॥ याची वाट पाहत आहेत. कृपा होतांच येतील. से श्रु. हे विज्ञापना.

## अनुभव ३

मी ता. २१।११।३२ ला इंदूरहून जिरापुरला गेलों व ता. २२।११ ला इंदूरचें पत्र आलें कीं, चि. आण्णा (मुलगा) ची प्रकृती ज्वरामुळें बिमार आहे. वैद्यराज दीनानाथजींचें औषध सुरू आहे व ते रोज येऊन प्रकृति पाहत असतात. फिकरीसारखें नाहीं. मुदती ज्वर आहे वगैरे झालें. मनांत नाना प्रकारें शंका येऊं लागल्या व लगेच दुसऱ्या दिवशीं तार आली कीं, "प्रकृति जास्त बिघडली, जरूर या." सकाळचे मोटरशिवाय जाण्यास दुसरी सोयच नाहीं, म्हणून रात्रभर तळमळ व बाबांचा धांवा चालू होता. सकाळीं मोटरनें रवाना होऊन सायंकाळीं इंदूरला आलों. ज्वर पाहिला; तो ३॥ डिग्री होता. निरोप कळल्यानें वैद्यबुवाही आले, (गांवाप्रमाणें ते दीनानाथच आहेत,) त्यांनीं सांगितलें, आणखी ५।६ दिवसांत कमी होईल.

पण मनास स्वस्थता वाटेना, म्हणून वैद्यबुवा गेल्यावर (बाबांच्या हातची उदी ) पोटांत दिली. रात्रीं त्यास उत्तम झोंप आली. सकाळीं ज्वर पाहिला तो मुळींच नाहीं; थोडया वेळानें वैद्यबुवाही आले व त्यांनीही ज्वर पाहिला व म्हणाले ज्वर मुळींच नाहीं प्रकृति उत्तम आहे. हें कसें झालें ! तेव्हां मीं उदीची हकीकत त्यांना सांगितली, त्यावरून त्यांनाही आश्चर्य वाटलें !

असें नेहमी संकटांत रक्षण होत असतें. म्हणून श्रीचरणीं हीच प्रार्थना आहे की

|| सकाळ तुझ्या पायीं, मानिला विश्वास, न करी उदास आतां मज ||
|| मज आतां ऐसे नको करूं देवा, तुझा दास जावा पायावीण ||
|| होईल थोरपण जाणीवेचा भार, दुरावती दूर पाय तुझे ||
|| तुका म्हणे तुझे पाय आतुडती, ते मज विपत्ती गोड देवा || १ ||.

से. श्रु. हे विज्ञापना.

आ. नम्र,

ता. ४-१२-३४
मंगळवार का.व॥ १३
श्रीज्ञानेश्वर महाराज पुण्यतिथि

दामोदर भगवंत रामपुरकर,
हुजूर, चिटणीसचा वाडा,
घर नं. ८०, आडाबाजार, इंदूर

# आक्टोबर १९३४ चें शिर्डीवृत्त

शिर्डी येथें आक्टोबर महिन्यांत श्रीसाईसमाधिदर्शनाकरितां संतोषी बाधव व श्रीसाईभक्त पुढील ठिकाणाहून आले होते. त्यांची संख्या ७५ होती. श्रीसाईबाबा यांच्या संस्थाननें चालविलेला पुण्यतिथीचा उत्सव ह्या महिन्यांत झाला होता. ही मंडळी मुंबई, वांद्रे, खार, सान्ताक्रूझ, अंधेरी, रहाणु, ठाणें, खेडा, पुणें, येवला, नायडोंगरी, सिन्नर, अहमदनगर, पारनेर, संगमनेर, ताळेगांव, वेळापूर, जळगांव, भुसावळ, अकलवत, विठे, आजलें व कराची ह्या ठिकाणाहून आली होती. ह्या मंडळींत कराची येथील एक प्रेमळ साईभक्त रा. रा. ज. पा. वाघकर हे सर्व मंडळीसह आले होते. त्यांच्याबरोबर कराचीचे दुसरे साईभक्त रा. रा. अनंत तुळाजी टेमकर हेही आले होते. रा. रा. दत्तात्रय दा. रासने हे गेल्या महिन्याप्रमाणें रोज रात्रीं ७॥ ते ८॥ वाजेपर्यंत श्रीपुढें संगीत भजन करीत असत. रा. रा. रघुनाथ बी. आठवले, इरिगेशन ओव्हरसियर, शिर्डी हे शिर्डी येथें गेल्या वर्षापासून बदली झाल्यापासून कोणत्या ना कोणत्या रीतीनें श्रींची सेवा करीत असतात. त्यांनीं ता. १९।१०।३४ रोजीं श्रीद्वारकामाईमध्यें दीपोत्सव केला. नगरचे रा. रा. एल्. नवले, एम्. एल्. सी., व रा. रा. बाळकृष्ण विनायक चौधरी वकील आणि पारनेरचे रा. रा. पाटणकर सब-रजिस्ट्रार हेही या महिन्यांत श्रींचें दर्शन घेऊन गेले.

२. पुण्यतिथिउत्सवाची व्यवस्था व संस्थानच्या भांड्यांची व जिनसांच्या यादी करण्याकरितां संस्थानचे कळकळीनें काम करणारे एक विश्वस्त रा. रा. दादासाहेब देव त्यांचें कुटुंब सौ. जानकीबाई व कमिटीचे एक सभासद रा. रा. र. भा. पुरंदरे हे ता. ११।१।३४ ला शिर्डी येथें गेले. उत्सवाकरितां सान्ताक्रुझाचे रावबहादुर मो. वि. प्रधान मुलांसह व व. ना. गोरक्षकर कुटुंबासह आले होते. त्यांच्या-बरोबर मुंबईचे रा. रा. यशवंत वि. देसाई, ॲडव्होकेट हेही आले होते. परळ, मुंबई येथील डॉ. शिवशंकर, शि. द. नवलकर हे कुटुंब व मुलेंबाळेंसह पहिल्यानें शिर्डीस आले. मुंबईचे डॉ. के. दा. साने, पोलिस सबइन्स्पेक्टर रा. रा. ना. श्या. सावंत व त्यांचे दादर येथील मित्र रा. रा. ए. आ. पाटणकर, श्री. व्यंकट लिंबाजी कोंडल, रा. रा. सुंदरराव दि. नवलकर त्यांचें कुटुंब सौ. शान्ताबाई व मुलगा, ठाणें येथील रा.रा. श्री.ना. खारकर यांचे कुटुंब, मुलगा, मुली व त्यांच्याबरोबर इतर मंडळी, वांद्र्याचे य. द. कर्णिक, अंधेरीचे वि. भा. वैद्य, खारचे श्री. बाबासाहेब तर्खड, नगरचे रा. रा.

दामुअण्णा रासने व त्यांचे मुलगे व कुंभकर्ण, पुण्याहून इंजीनियरिंग कॉलेजचे प्रो. त्री. जी. नरके, रा. रा. गो. का. गाडगीळ, डहाणू येथील शेट गोवर्धन गिरधर तन्ना मुलांसह, ओजलेंच दा. रा. बापट वगैरे भक्तमंडळी आली होती. सौ. लक्ष्मीबाई गो. का. गाडगीळ ह्या त्यांच्या आचारी सीताराम यांस घेऊन उत्सवाची व्यवस्था करण्याकरितां एक दिवस आधीं आल्या होत्या. मेमदाबाद येथील खेडा जिल्हा पेन्शनर डॉ. छोटालाल भुलाभाई भट हेही आले होते. सौ. जानकीबाई देव, बाळासाहेब देव, यांचें कुटुंब ह्या शिर्डी येथें गेल्यापासून आजारी झाल्यामुळें त्यांस उत्सवांतील व्यवस्था करण्याबद्दलची एक प्रकारची श्रींची सेवा—त्यांना करितां आली नाहीं. त्या उत्सवाचा कार्यक्रम संपेपर्यंत बिछान्यांत होत्या. आतां त्या बऱ्या आहेत.

३. ह. भ. प. बनुबाई या गेल्या गुरुपौर्णिमेस शिर्डी येथें आल्या होत्या. त्याबद्दलची हकीकत मागें आली आहे. त्या वेळीं शिर्डी येथील मंडळीस त्यांचें कीर्तन पसंत पडून त्यांनीं बनुबाईस पुण्यतिथिउत्सवास येण्याबद्दल आग्रह केला. त्या वेळीं त्यांनीं कांहीं जबाब दिला नाहीं. फक्त म्हणाल्या कीं, " विलेपार्ले येथील रा. रा. दाजी विठ्ठल सांवारे यांजकडे आज १४ वर्षे पुण्यतिथीचें कीर्तन करीत आलें आहें, म्हणून दाजी यांस विचारावें. गेल्या गणेश चतुर्थीच्या दिवशीं त्यांचें कीर्तन सान्ताक्रुझ येथें रावबहादुर मो. वि. प्रधान यांच्या गणपतीपुढें झालें. त्या वेळीं रावबहादुर प्रधान यांनीं बनुबाईस शिर्डी येथें पुण्यतिथिउत्सवाकरितां येण्याबद्दल गोष्ट काढली. तिनें दाजी यांजकडे बोट दाखविलें. नंतर सर्वांच्या संमतीनें श्रीसाईपुढें चिठ्या टाकून निर्णय करून घ्यावयाचा असें ठरलें. त्याप्रमाणें बनुबाईनें शिर्डी येथें पुण्यतिथिउत्सवास जावें असा चिठ्ठी आली. त्यामुळें दाजी यांस आज १४ वर्षे पुण्यतिथीच्या बनुबाईच्या कीर्तनाची समाप्ति करावी लागली व त्याप्रमाणें त्यांनीं ता. १४।१०।३४ रविवार रोजीं पार्ले येथें त्यांच्या घरीं बनुबाईच्या कीर्तनाची समाप्ति करून त्यांस एक रेशमी कफनी अर्पण केली. कीर्तन झाल्यानंतर बनुबाई म्हणाल्या कीं, त्यांना शिर्डीस पुण्यतिथिकरितां जातां येणार नाहीं; कारण त्यांचा दूरशीचा महिना आहे व त्यामुळें शिर्डीस जाऊनही त्यांचा कांहीं एक उपयोग होणार नाहीं. त्यावर रा. रा. य. ज. गाळवणकर, रावबहादुर प्रधान व बाबासाहेब तर्खड यांनीं तीस सांगितलें कीं, ज्या अर्थी श्रीसाईबाबांच्या चिठ्ठींत बनुबाई शिर्डी येथें पुण्यतिथिउत्सवाकरितां जावें असें होतें, त्या अर्थी उत्सव संपून मुंबईस परत येईपर्यंत त्या दूरशी होणार नाहींत.

शिवाय आणखी त्यांस सांगितलें कीं, जर तुम्ही ता. १७।१०।३४ बुधवारी रात्रीं दसऱ्याच्या दिवशीं शिर्डीस निघण्यापूर्वी दूरशी झालां, तर मात्र नाइलाज आहे. पण ती सर्व मंडळी खात्रीनें म्हणाली कीं, उत्सवानंतरच दूरशी बसाल व निघण्यापूर्वी झाल्यास ऑ. चिटणीस रा. रा. सुं. दि. नवलकर यांस कळवावें. बनुबाईची साथ करणार रा. रा.

विष्णु. रा. दुखंडे हे नवलकराकडे ता. १६।११।३४ रोजी आले. त्यास पाहून नवलकर चकित झाले. कारण ते व दुखंडे, बनुबाई दूरशी झाल्याबद्दलचा निरोप सांगावयास आले आहेत व त्यामुळें श्रीसाईबाबांच्या चिठीप्रमाणें तिचें जाणे शिर्डी येथें उत्सवाकरितां होत नाही. जेव्हां श्री. दुखंडे यांनी कळविलें कीं ती दूरशी अजून झाली नाहीं, पण ती एकदोन दिवसांनी होईल असें तिला वाटतें म्हणून ती शिर्डीस येत नाहीं. यावर नवलकर यांनी त्यांस उत्तर दिलें कीं, तुमचा बाबांच्या चिठीवर विश्वास नाहीं, म्हणून तुमचें मन इकडेतिकडे झुकतें. गेल्या गुरुपौर्णिमेसही अशीच शंका तुम्ही घेतली होती. त्या वेळीं श्रीसाईबाबांनी ५.७ मिनटांची लीला दाखविली, तरी आपला विश्वास नाहीं. असो. त्या उत्सव संपून परत येईपर्यंत दूरशी बसणार नाहीत हें मात्र पक्कें समजा व त्याप्रमाणे बनुबाई ता. २०।१०।३४ रोजी उत्सव संपल्यानंतर आठ दिवसांनी ता. २७।१०।३४ ला दूरशी बसल्या. ह्यांत श्री. साईबाबांनीं त्यांची श्रद्धा दृढ करण्याकरितांच मागल्याप्रमाणें ही लीला दाखविली ह्यांत संशय नाहीं.

४ पुण्यतिथीचा उत्सव बुधवार ता. १७ आक्टोबर रोजी सुरू होऊन तो शनिवार ता. २० आक्टोबर रोजीं समाप्त झाला. पूर्व कार्यक्रम छापिल्याप्रमाणें थोडा फेरफार करून उरकण्यांत आला. पुण्यतिथीच्या दिवशीं ता. १८ आक्टोबर गुरुवार रोजीं श्री. बाळासाहेब देव यांनीं स्वतः तयार केलेलें श्रीसाईपुण्यतिथि–आख्यान लावून तीन तासपर्यंत कीर्तन केलें. त्यांस यांचे पुतणे रा. रा. विष्णु गोविंद देव यांनीं गायनाची साथ दिली, व त्यांचे कनिष्ठ चिरंजीव श्रीनिवास देव यांनीं पेटीची साथ केली. कीर्तन प्रेमळ होऊन भक्तिरसानें भरलेलें झालें. ता. १९ ऑक्टोबर शुक्रवार रोजीं त्यांनीं स्वतः रचलेलें दत्तआख्यानानें कीर्तन तीन तासपर्यंत केलें. हेंही कीर्तन चांगलें झालें. शनिवार ता. २० ऑक्टोबर रोजीं सकाळीं काल्याचें कीर्तन रा. रा. बापाजी यांनीं केलें व उत्सवाची समाप्ति झाली. संध्याकाळीं गांवजेवण झालें व रात्रौ आजरेंं येथील पेन्शनर डे. ए. इ. रा. रा. दामोदर रामकृष्ण बापट यांनीं समाधिमंदिरांत दोन तास कीर्तन केलें. आख्यान एकनाथमहाराजांचें लावलें होतें. त्यांची सांगण्याची शैली जुन्या पद्धतीची होती. परंतु त्यांस साथ बरोबर न मिळाल्यानें कीर्तनास रंग आला नाहीं. त्यांनीं आख्यान कसें तरी रेटीत नेऊन पूर्ण केलें. उत्सवांत संस्थानच्या नोकरांस व गोरगरिबांस कपडे वांटले. ह्या उत्सवाची सविस्तर हकीकत श्री. बाळासाहेब देव उत्सवाचा अहवाल देतील त्यांत येईल. कोपरगांवचे मामलतदार रा. रा. फडके विश्वस्तांच्या निमंत्रणास मान देऊन प्रसादाकरितां शनिवारीं आले होते. श्रीयुत बाळासाहेब देव हे शिर्डीत असतांना रोज श्रीज्ञानेश्वरीवर पुराण सांगत होते. उत्सवांत भक्तांकडून

श्रींस अभिषेक करण्यांत आले. देवास २ येथील श्रीमंत मासाहेब यांनीं श्रींस लघुरुद्र केला व ब्राह्मण सवाष्णी जेऊं घातल्या.

## ५ देणगी जिनसा वगैरे आल्या त्यांचा तपशील

१ रा. रा. विठ्ठल बाळाजी कुंभकर्ण, अहमदनगर,-श्रींची शुभ्रकाठी उपर्णे जोडी व व यळ कापडाचा गलेफ.

२ ,, ,, नागेश आत्माराम सावंत,-मुंबई, मोराचे पिसांचे २ कुंचे, व मोठी सतरंजी व कायम फंडास रु. १८०

३ कु. श्रीमंतीबाई ( डॉली ) वसंतराव गोरक्षकर, सान्ताक्रुझ-एक क्याश्मिरी हिरवी शाल

४ कु. सदाशिव ( बॉब ) वसंतराव गोरक्षकर, सान्ताक्रुझ-श्रींची समाधि पुसण्याकरितां १ मोठी टॉवेलजोडी व श्रींची तसबीर पुसण्याकरितां १ लहान टॉवेल जोडी.

५ रा. रा. गोविंद विनायक वाड,भुसावळ,-१ रेशमी साटीनचा पिवळा गलेफ.

६ ,, ,, आ. ला. आरोळकर, गुंतकल, १ रेशमी फीत लावलेला गलेफ.

७ ,, ,, महादेव जिवाजी महाजन,-मुंबई, १ शेर उद.

८ ,, ,, फ्रामरोज मेरवानजी कमिशेरीयटवाला,-दादर,-मुंबई १ पौंड उद व १ उदबत्ती पुडा.

९ ,, ,, डोराबजी धनजीशा ताडीवाला,मुंबई, १ अत्तरबाटली.

१० रावबहादुर अनंत प्रभु वांबर्डेकर,-मुंबई;-१ पांढरी खादीची शाल व १ उदबत्तीपुडा.

११ रा. रा. श्रीधर नारायण खारकर,-ठाणे,-मातुःश्रींच्या स्मरणार्थ १ भगवी रंगाची काश्मीरी शाल.

१२ रावबहादुर मोरेश्वर वि. प्रधान व सौ. छोटुबाई मो. प्रधान, सान्ताक्रुझ,-अनंताच्या पूजेच्या उद्यापनाप्रीत्यर्थ श्रींस वायन-१ पितळी नक्षीचें ताट लहान, १ आरशी, लहान, २ रेशमी भरतकाम केलेल्या उशा, १ साटीनचे फित लावलेलें आसन, १ गोमुखी, व १ काचेच्या मण्यांची जपमाळ व शुभ्रकांठी धोतर.

१३ कु. साईप्रभा मो. प्रधान, सान्ताक्रुझ-१ श्रींच्या तसबिरावर घालण्या-करितां साटीनच्या फुलाचा हार.

१४ रा. रा. जयराम पांडुरंग वाक्कर,-कराची,-१ रेशमी गुलाबी रंगाचा गलेफ, १ सुती सदरा, १ पांढरा रुमाल व कायम फंडास १ रुपया.

१५ सौ. वत्सलाबाई जयराम वाक्कर,–कराची–मुलाचें एक झबलें,–लोकरीचें. श्रीसाईंनी स्वप्नांत मागितल्यावरून.

१६ सौ. इंदिराबाई फडणीस,–बेळगांव, रु. ३–१२–९ कायमनिधीस.

१७ रा. रा. गजानन शिवराम पाटणकर,-पारनेर, रु. ४-६-९ कायमनिधीस.

१८ डॉ. छोटालाल भुलाभाई भट,-मेमदाबाद, रु. ३०. कायमनिधीस.

१९ रा. रा. ए. व्ही. चित्रे,-सरकारी वकील, ठाणें, रु. १० कायमनिधीस.

२० रघुनाथ बी. आठवले,–शिर्डी, रु. १० कायमनिधीस.

६. रा. रा. अर्जुन गोविंद शेट हरमल, भांबुर्डा पोलिस हेडक्वार्टर्स, पुणें ४, हे ता. ३०।७।३४ रोजीं श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानच्या भक्तमंडळाचे शके १८५६ ची रु. ५ वर्गणी देऊन सभासद झाले. शिर्डी येथील इरिगेशन ओव्हरसियर यांनीं श्रीद्वारकामाईत ता. १९।१०।३४ रोजीं दीपोत्सव केला होता.

७. मुंबईचे रा. रा. केशव गणेश तांबे इंजीनिअर यांचे ॲसिस्टन्ट रा. रा. त्रिंबक राजेश्वर भिडे यांना सभामंडपाचा प्लान तयार करण्याकरितां संस्थानचे ऑ. चिटणीस रा. रा. सुं. दि. नवलकर पुण्यतिथीच्या उत्सवाच्या वेळीं शिर्डी येथें घेऊन गेले, व त्या वेळीं शिर्डी संस्थानकमिटीची सभा असल्यामुळें बहुतेक सभासद हजर होते. त्यामुळें प्लानाची योजना वगैरे नक्की करण्यांत आली. ते आल्यामुळें अहमदनगरचे रा. रा. दामोदर सावळाराम रासने, श्रींचे जुने व निस्सीम भक्त यांस सभामंडपाची योजना समजावून देण्यास सुलभ झालें व त्यामुळे रा. रा. रासनें यांनीं सभामंडपाच्या कामाकरितां रु. ५०१ कार्तिक शु. १ शके १८५६ ह्या बलिप्रतीपदेच्या मुहूर्तावर पाठवून देण्याबद्दल आश्वासन दिलें. त्याच्याकडून रक्कम आल्यावर सभामंडपाच्या कामास स्वयंपाकघराच्या भागापासून कमिटीच्या ठरावाप्रमाणें सुरवात लवकरच करण्यांत येईल. रा. भिडे यांजकडे ही संस्थानच्या जागेवर-श्रीसाईभक्तांनीं घर बांधण्याकरितां देऊं केलेल्या रकमेनें घरें बांधण्याबद्दलचा प्लान करण्यास दिले आहेत. रा. रा. भिडे हे आपला अमोल्य वेळ खर्चून संस्थानास त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा शिर्डी येथें येऊन फायदा दिला त्याबद्दल संस्थान त्यांचें आभारी आहे.

## शिर्डी संस्थान समाचार

शिर्डी संस्थानकमिटीची सभा ता. १८ व १९ आक्टोबर रोजीं भरली होती. सभेस १ रावबहादुर मोरेश्वर वि. प्रधान, २ रा. रा. तात्या गणपत पाटील व ३ रा. रा. बा. वि. देव, हे तीन विश्वस्त हजर होते. त्यांशिवाय सभासद १ रा. रा. रा. आ. तर्खड, २ रा. रा. र. भा. पुरंदरे, ३ रा. रा. ध. ना. गोरक्षकर, ४ रा. रा. बापूराव रा. बोरावके, ५ रा. रा. माधवराव ब. देशपांडे, ६ रा. रा. गो. का. गाडगीळ

व. ७ रा. रा. सुं. दि. नवलकर. त्या सभेंत खालील मुख्य कामें झाली. (१) के. शिरवळकर गवयांच्या जागीं दासगणूमहाराज यांचे शिष्य रा. रा. विठ्ठलराव यांची नेमणूक फाल्गुन व॥ ३० शके १८५६ पर्यंत झाली आहे; (२) श्रीसाईमंदिरापुढील खुल्या जागेवर सभामंडपाचें काम सुरवात करण्यास रु. ३५०० पर्यंत जमा झाल्याशिवाय काम सुरू करूं नये; तथापि सभामंडपाचे अंतर्गत असलेल्या स्वयंपाकघराच्या भागापासून काम प्रथमपासून करण्यास हरकत नाहीं. (४) के. दीक्षित सॉलिसीटर यांनीं संस्थानास दिलेल्या जागेवर भक्तांनी देऊं केलेल्या रकमेनें घरें बांधण्याच्या कामास शक्य तितक्या लवकर सुरवात करावी. पुणें येथील रा. रा. विश्वनाथ गोविंद यांनीं सभामंडपाच्या कामाकरितां रु. ५०१ दिले; त्याबद्दल संस्थानकमिटीनें त्यांचे आभार मानिले.

९. शिर्डी संस्थान कमिटीची पोटकमिटीची सभा सान्ताक्रुस येथें ता. ७ आक्टोबर १९३४ रविवार रोजीं तिसऱ्या प्रहरीं ४ वाजतां रावबहादुर मो. वि. प्रधान यांच्या बंगल्यांत भरली होती. त्या वेळीं संस्थानकमिटीचीं मामुली कामें झालीं.

१०. मागील अंकांत शिर्डीवृत्तामध्यें लिहिल्याप्रमाणें नगरचे रा. रा. दामोदर सावळाराम यांनीं रा. रा. विश्वनाथ गोविंद मुदकर पुणें, यांजकडून सभामंडपाच्या कामाकरितां रु. ५०१ चा चेक रा. रा. विश्वनाथ गोविंद मुदकर, पुणें, यांजकडून आणून दिला.

## पेटीचें उत्पन्न

| ११ | द्वारकामाई पेटी | श्रीसमाधिमंदिर पेटी | एकंदर |
|---|---|---|---|
| ता. ९।१०।३४ | रु. २–१३–३ | रु. ४९–७–६ | रु. ५२–४–९ |
| ता. १७।१०।३४ | ०—५–९ | ९–४–३ | ९–१०–० |
| ता. २२।१०।३४ | १९–६–९ | ४९–६–६ | ६८–१३-३ |

ह्यापैकीं रक्कम रु. ६८–१३–६ ही उत्सव निधीमध्यें जमा करण्यांत आली. आजपर्यंत असें ठरलेलें आहे कीं, उत्सवाच्या दिवसांत जमलेली रक्कम ज्यांच्याकडे उत्सव साजरा करण्याची जबाबदारी आहे, त्यांस ती रक्कम उत्सवाच्या खर्चाकरितां द्यावी.

## इतर समाचार

१२. गुंटकल येथें रा. आ. ला. आरोळकर यांनीं श्रीसाईबाबा यांच्या पुण्यतिथीचा उत्साह केला. मामुलीप्रमाणें ब्राह्मणभोजन वगैरे कार्यक्रम होता.

वांद्रें येथें रा. रा. य. ज. गाळवणकर यांनीं पुण्यतिथीनिमित्तानें दरवर्षा-प्रमाणें हरिकीर्तन बादर येथील हरिदास यांनी केले.

विलेंपार्ले येथें रा. रा. दाजी विठ्ठल खांबारे यांनी पुण्यतिथि नेहमींप्रमाणें केली.

## भक्तांस विनंती

१३. शिर्डी येथें जे भक्त धर्मकृत्याकरितां रकमा परस्पर कोणाच्या तरी नांवीं पाठवितात, त्याबद्दल संस्थानास कांहीएक माहिती नसते, किंवा त्या भक्ताच्या मना प्रमाणें धर्मकृत्यें झाली किंवा नाहीं, हे समजण्यास संस्थानास मार्ग नसतो. भाद्रपद महिन्याच्या श्रीसाईलीलेच्या अंकांत याबद्दल इषारा देण्यांत आला होता. परंतु त्याकडे सर्वांचें लक्ष जावें तसें गेलें नाहीं असें दिसतें. भक्तांस कांहीं रक्कम,देणगी,जिन्नस, वगैरे श्रीसाईस अर्पण करावयाचे असल्यास व कांहीं धर्मकृत्यें करावयाचीं असल्यास त्यांनीं रकमा वगैरे संस्थानचे ऑ. खजिनदार रा. रा. रा. आ. तर्खड, ५१ पाली रस्ता, खार, मुंबई २१, किंवा ऑ. चिटणीस सु. दी. नवलकर, साईभुवन, १४१ प्रिन्सेस स्ट्रीट, या पत्त्यावर पाठवाव्यात, म्हणजे त्याबद्दलची संस्थानची छापील पावती देण्यांत येईल व त्या रकमा. जिनसा वगैरे संस्थानांत जमा करण्यांत येतील. नाहीं तर रकमेची व जिनसाची नोंद करितां येणार नाहीं, व त्यांची संस्थानांत नोंद न झाल्यामुळें कोणा भक्तास त्याबद्दल संस्थानास कांहीं एक विचारपुस करितां येणार नाहीं.

१४. बहुतेक भक्तांचा कल ज्या जिनसा श्रीसाईस अर्पण करण्यांत येतात त्यांत तो सारखा असतो. बहुतेकजण गलेफ व कपडा अर्पण करितात, त्यामुळें हे कपडे इतके जास्त झाले आहेत कीं, इतर मोठमोठया देवालयांत अशा जिनसांचा लिलाव करितात त्याप्रमाणें संस्थानासही करावें लागेल की काय असें वाटतें. भक्त आनंदानें श्रीचा प्रसाद म्हणून लिलावांत कपडे वगैरे विकत घेतील तो भाग निराळा आहे. तर भक्तानें त्याच्यावर श्रीसाईकृपा झाल्याबद्दल नवसप्रीत्यर्थ किंवा कोणत्याही कार्याप्रीत्यर्थ संस्थानच्या कायमनिधीस रकमा दिल्या, तर संस्थानचा कायमनिधि वाढून त्याच्यावरील व्याजाच्या उत्पन्नांतून किती तरी लोकोपयोगी गोष्टी करण्यांत येतील. हल्लीं संस्थानच्या कायमनिधीवरील व्याजांतून श्रीसाईबाबा यांच्या नित्यपूजेचा रोजचा खर्च व इतर किरकोळ कामाचा खर्च कसा तरी पुरा होतो. उत्पन्न थोडें असल्यामुळें भक्तांस राहण्याची गैरसोय फार होते हें संस्थानास माहीत आहे. पैशाच्या अभावीं संस्थानास कांहीं एक करितां येत नाहीं. श्रीसाईकृपेनें संस्थानच्या जागेवर मुंबईचे डॉ. केशरीनाथ वासुदेव साने व सी. आय. डी. पोलिस सबइन्स्पेक्टर रा. रा. ना. आ. सावंत व त्यांचे मित्र रा. रा. स० आ. पाटणकर यांनीं दिलेल्या रकमेनें संस्थानास कै.ह.सी.दीक्षीत यांनी दिलेल्या जागेवर जर धोषणांची कामे लवकरच यंत्रा

डिसेंबर महिन्यापासून सुरवात करण्याचा संस्थानचा बेत आहे. जर कोण भक्तास त्याच्या प्रिय माणसाच्या नांवानें अथवा स्वतःच्या नांवानें, घरें बांधण्याकडे देणगी वगैरे द्यावयाची असल्यास ती त्यांनीं आतां दिल्यास घरें बांधण्याचें काम सुलभ होऊन खर्चही कमी होईल, तर भक्तांनीं श्रीसाईप्रीत्यर्थ कांहीं द्यावयाचें असेल, तर त्यांनीं त्याबद्दल रक्कम संस्थानचे कायमनिधींत भरावी व अशा रीतीनें कायमनिधि वाढून त्याचें उत्पन्न वर लिहिल्याप्रमाणें सर्वांच्या उपयोगीं पडेल.

१५. शिर्डी येथील हवा उन्हाळ्याच्या एक महिन्याशिवाय अकरा महिने चांगली असते. तेथे रोगराई नसून व आतां तेथें ग्रामपंचायत झाल्यानें गांवांत साफसूफपणा जास्त ठेवण्यांत येतो. व निर्दीष्ट केलेल्या घरांची योजना पूर्ण झाली म्हणजे जसे लोक हवा पालटण्याकरितां बाहेरगांवीं जातात, तसे श्रीसाई भक्त हवा पालटण्यास--शरीराकरितां व मानसिक यातनेकरितां शिर्डीस येऊन राहूं लागतील. इतर ठिकाणच्या हवा पालटीनें फक्त शरीराचा फायदा होतो, परंतु शिर्डीस आल्यानें दोन फायदे मिळतील. शरीराचा फायदा होईल व स्वतःचा मनाचा व आत्मत्वाचा फायदाही करून घेतां येईल. असा दुहेरी फायदा होतो; असें जेव्हां श्रीसाईभक्तास कळूं लागेल, तेव्हां शिर्डी गांवांत बाहेरच्या लोकांस राहण्यास पुरेशी जागा मिळणार नाहीं. असे मला वाटतें व तो दिवस लवकरच श्रीसाईकृपेनें येईल असें मी इच्छितों.

साईभुवन
१४१ प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २.
ता. ५ नोव्हेंबर १९३४

सुंदरराव दी. नवलकर,
ऑ. सिटणीस

# नोव्हेंबर १९३४ चें शिर्डीवृत्त

नोव्हेंबर महिन्यांत शिर्डी येथें ६५ संतप्रेमी भाविक श्रीसमाधि-दर्शनाकरितां कोपरगांव, नगर, सिन्नर, पिंपळगांव, पुणें, भुसावळ, शिरजगांव, ( ता. वैजापूर ) कोसी, जि. मथुरा, थोकोडे, ता. अलीबाग, व मुंबई या ठिकाणांहून आले होते. ह्या मंडळींत सरदार एन. वाय. मिरीकर, पुण्याचे डॉ. शामसुंदर शंकर तेंडुलकर, कोपरगांवचे श्रीयुत के. एन. देशमुख वकील व श्रीयुत जी. एस. देशपांडे वगैरे मंडळी होती. नगर जिल्ह्याचे कलेक्टरसाहेब भनसाळी हे कोपरगांवचे मामलतदार श्रीयुत फडके यांजबरोबर श्रीदर्शनास आले होते.

कांहीं भक्तांनीं श्रीस अभिषेक केला व गरिबांस जेवूं घातलें. मुंबईचे पार्शी गृहस्थ श्रीयुत डी. एम. राजा यांनीं त्यांच्या चुलत भावाच्या प्रकृतीस आराम पडावा म्हणून कार्तिक पौर्णिमेच्या रात्री समाधीपुढें रात्रभर समई लाविली होती. मुंबईचे श्रीयुत दिवेचा सॉलिसिटर यांचा श्रीयुत बाबासाहेब तर्खड यांच्या पत्रावरून अभिषेक झाला. त्याचप्रमाणें मेमदाबाद येथील साईभक्त छोटालाल भुलाभाई भट यांचाही अभिषेक झाला.

नगरचे श्रीयुत त्रिंबक दामोदर रासने हे मंडळीसह शिर्डी येथें आले होते व त्यांनीं श्रीस दुधाचें व सुगंधी तेलाचें स्नान घातलें. श्रीस नैवेद्य केला होता व ब्राह्मण सुवासिनी जेवूं घातल्या. ता. १५।११।३४ रोजीं श्रींच्या चावडीच्या मिरवणुकींत फटाके व शोभेची दारू लावली व चावडी नंतर शेजारती झाल्यावर सवाशें मंडळीस चहा केला व संस्थानच्या नोकर मंडळीस फराळ केला.

श्रीयुत दत्तात्रय दामोदर रासने हे मागील महिन्याप्रमाणें श्रीपुढें ता. ११।११।३४ पर्यंत रोज भजन करीत असत. दिपवाळींत लक्ष्मी-

पजनाच्या वेळीं शोभेची दारू श्रीपुढें लाविली व श्रींच्या समाधिमंदिरावर ता. २०-११-३४ पासून रात्रीं कंदिल लावण्यास सुरवात केली आहे.

शिर्डीचे भाऊ कुंभार महाराज यांनीं श्रीस अभिषेक करून पुरण, वरणभाताचा नैवेद्य करून दहा माणसें जेवावयास घातलीं.

## जिनसा, देणगी वगैरे आल्या त्यांचा तपशील

( १ ) श्रीयुत मोतीराम स्वरुपचंद सिन्नर,-श्रीस चांदीची छत्री १ ॥ तोळे

( २ ) श्रीयुत दामोदर सावळाराम रासने, नगर, रु. ५०१ श्रींच्या मंदिरासमोर.

## सभामंडप बांधण्याकरितां

( ३ ) श्रीमती पिरोजबाई रामराव, निंबाखालील पादुकांजवळ रोज दिवाबत्ती कराण्याबद्दल नव्हेंबर महिन्याचे रु. २

ता. ८-११-३४, कार्तिक शु. १ रोजीं शिर्डी येथील पेटयांत जमा:—

श्रीसमाधि मंदीरपेटी. रु. २३-७-०; श्रीद्वारकामाई पेटी, रु. ०-१५-३

## संस्थानसमाचार

शिर्डी संस्थान कमिटीच्या पोटकमिटीची सभा ता. ११-११-३४ रविवार रोजीं सान्ताक्रुझ येथें रावबहादुर मो. वि. प्रधान यांच्या बंगल्यांत संध्याकाळीं भरली होती. त्या वेळीं इतर कामांपैकीं खालील कामें झालीं (१) ह. भ. प. दासगणू महाराज यांचे शिष्य रा. रा. विठ्ठलराव यांस घरगुती कामाकरितां गांवीं जाण्याचें असल्या कारणानें त्यांस शिर्डी येथें गवयाच्या जागेवर रुजू होतां येणार नाहीं, म्हणून दासगणूमहाराजाचें पत्र आल्यावरून गवयाच्या जागीं त्यांचे दुसरे शिष्य किसनराव यांची तात्पुरती रा. रा. विठ्ठलराव रुजू होईतोपर्यंत नेमणूक पोटकमिटीनें केली आहे व त्याप्रमाणें दासगणूमहाराजांस ऑ. चिटणीस यांनीं कळविलें आहे.

( २ ) शिर्डी येथील श्रीसमाधिमंदिरासमोरील जागेवर सभामंडपाचें काम सभामंडपास जोडून असलेल्या स्वयंपाकघरापासून सुरवात करावी.

( ३ ) संस्थानच्या नोकरांकडे व इतरांकडे परस्पर मनिऑर्डरी येतात, त्या संस्थानचे ऑ. खजिनदार अथवा ऑ. चिटणीस याजकडे पाठविण्याबद्दल भक्तांच्या माहितीकरितां वर्तमानपत्रांत जाहिराती द्याव्यात असें ठरलें.

सभामंडपाचा प्लान करण्याचें काम चालू आहे व तें पुरें झाल्यावर कामास लवकरच श्रीकृपेनें सुरवात करण्यांत येईल.

लेंडीबागेंतील नवीन हौद बांधण्याच्या कामास सुरवात झाली आहे. जुन्या हौदास फाट पडल्यामुळें तो मोडून त्यापेक्षां मोठा हौद बांधण्याचें काम संस्थानचे शिर्डी येथील विश्वस्त श्रीयुत तात्या गणपत पाटील यांच्या देखरेखीखालीं संस्थानचा मेहनती नोकर श्रीयुत बाळा पिलाजी गुरव करून घेत आहे.

शिर्डी येथें कै. काकासाहेब दीक्षित यांनीं संस्थानास दिलेल्या जागेवर सॅनिटेरियमच्या धर्तीवर लहानशीं घरें बांधण्याबद्दलचा प्लान तयार करण्याचें काम चालू आहे. ज्या कांहीं साईभक्तांनीं एक एक घर बांधण्याकरितां रकमा देऊं केल्या आहेत, त्यांना प्लान तयार झाल्यावर व प्रत्येक घराच्या खर्चाचा अंदाज कळविल्यावर घरें बांधण्याच्या कामास श्रीसाईकृपेनें लवकरच सुरवात होईल.

दासगणूमहाराज यांचा मुक्काम पंढरपुरास आहे.

शिर्डी येथें हवा उत्तम असून कडक थंडी पडण्यास सुरवात झाली आहे. ज्या भक्तास नाताळांत शिर्डी येथें आवयाचें असल्यास, त्यांत तेथें राहण्याची, दिवाबत्तीची व भांडयाकुंडयाची सोय आहे. ह्या जिनसा त्यांस तेथें न्याव्या लागणार नाहींत. नाताळांत आगगाडीचे दर कमी केलेले आहेत.

साईभुवन,
१४१ प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २
ता. ५ डिसेंबर १९३४

सुंदरराव ह्रि. नवलकर
ऑ. चिटणीस
शिर्डी संस्थान कमिटी.

# कै. भक्तशिरोमणी श्रीम्हाळसापति

श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योनमः

श्रीसाईलीला संपादक महाशय यांस

सप्रेम कृ. शि. न. विनंती विशेष. कै. भक्तशिरोमणि म्हाळसापति यांच्या चिरंजीवांनीं बाबांच्या संबंधानें म्हाळसापतींच्या सांगण्यावरून कांहीं अनुभव लिहून ठेविले आहेत असें मी बरींच वर्षें ऐकत होतों, व जेव्हां जेव्हां मी शिरडीस जाई, तेव्हां तेव्हां ते अनुभव मला दाखवा म्हणून विनंतीही करीत असें. परंतु योग येईना. गेल्या पुण्यतिथीच्या वेळीं हा योग आला व श्री. मार्तंडभाऊ ( म्हाळसापतींचे चिरंजीव ) यांनीं ती वही मला दाखविली. बाबांच्या मंदिरांत असलेले उमेदवार श्री. निवृत्ति शेळके यांजकडून मी त्यांची एक प्रत करून घेतली. तिला श्रीसाई-लीलेच्या एखाद्या किंवा जरूर तर जोड अंकीं कृपेनें प्रसिद्धी मिळावी.

हे अनुभव खुद्द श्री. म्हाळसापतींनीं आपल्या मुखानें सांगून ते त्यांच्या चिरंजीवांनीं लिहून ठेविले आहेत. तेव्हां त्यांच्या सत्यतेबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं.

व्याकरणदृष्ट्या कांहीं ठिकाणीं झालेली वेडीवांकडी वाक्यरचना व असलेलीं अशुद्धें शुद्ध करून त्यांची भाषा व त्यांचा अर्थ यांची हानि न होऊं देतां त्यांचे अनुभव जशाचे तसेच दिले आहेत. श्री. म्हाळसापतींनीं व त्यांच्या चिरंजीवांनीं हे अनुभव देतांना म्हाळसापतींचें अत्यंत त्रोटक चरित्रही दिलें आहे असें म्हटलें तरी चालेल. त्याचा सारांश खालीं लिहिल्याप्रमाणें :

म्हाळसापति हे जातीचे सोनार. हे पिढीजाद शिरडीचेच राहणारे. यांचें शिरडीस एक १४–१५ खणी घर व ७॥ एकर जमीन आहे. पूर्वी-पासून हे खंडेरायाचे भक्त. हे पूर्ववयांत कांहीं सोनारकीचा धंदा करीत. पण धंद्यांत त्यांना यश येईना. म्हणून ईश्वरप्रेरणेनुरूप त्यांनीं धंदा करण्याचें सोडून देऊन भिक्षावृत्ति पत्करिली. ह्यांना चार मुली–जानकीबाई,

सीताबाई, रखुमाबाई व विठाबाई, अनुक्रमे अस्तगांव, डोचळे, डोऱ्हाळे व शेईल दिल्या होत्या. (पैकीं हल्लीं विठाबाई फक्त हयात आहे) व दोन मुलगे झाले. पहिला मुलगा वारला. त्यामुळें त्यांचें संसारांतून मन उडालें. पण बाबांच्या कृपेनें त्यांना दुसरा मुलगा झाला व तो हल्लीं ३७ वर्षांचा हयात असून त्याचें लग्न होऊन त्यास एक मुलगा व दोन मुली आहेत.

गांवांत कोणी साधुसंत आले, म्हणजे त्यांची व्यवस्था करण्याचें काम श्री. म्हाळसापति व त्यांचे मित्र श्रीकाशीराम शिंपी व मिळ्ळ (आपा जागले) यांच्याकडे असे.

म्हाळसापतींची जन्मतिथि मिळूं शकत नाहीं. मरणसमयीं त्यांचें वय अजमासें ८५ वर्षांचें असावें. त्यांची मरणतिथि भाद्रपद कृ. ६ मंगळवार शके १८४३ आहे. त्यावरून त्यांचा जन्म शके १७५८ असावा असें दिसतें.

म्हाळसापतींच्या कुटुंबाचें नांव शिऊबाई. त्या हल्लीं हयात आहेत. त्यांचें वय ७५ वर्षांचें असावें असें वाटतें. त्यांचें माहेर नांदुर शिंगोटे. म्हाळसापतींचें हें पहिलेंच कुटुंब. तें वृद्ध असून सुस्वभावी आहे.

बाबा निजामशाहींतील एका मुसलमानाच्या वऱ्हाडाबरोबर शिरडींत आले. ते प्रथम श्रीखंडेरायाच्या मंदिरांत आले; त्या ठिकाणीं म्हाळसापति बसले होते. त्यांनीं बाबांना आवो साईबाबा असें म्हणून हाक मारली व नंतर गांवांत नेऊन त्यांच्या स्नेह्यांची (काशीराम शिंपी व जागले) गांठ घालून दिली. त्यांनीं बाबांना श्रीद्वारकामाईंत नेऊन ठेविलें. बाबा कांहीं महिने (पूर्वीं साठेसाहेबांच्या, हल्लीं नवलकरसाहेबांच्या वाड्यांतील) लिंबाच्या झाडाखालीं राहत असत. तेथें जवळ बाबांनीं म्हाळसापतींस व इतर मंडळीस आपल्या श्रीगुरुरायाची समाधि (जमीन खोदावयास सांगून त्याखालीं असलेली) दाखवून लागलीच तीं तशीच्या तशीच पुरून त्या ठिकाणीं दर गुरुवारीं व शुक्रवारीं धूप जाळण्यास आज्ञा केली.

पुढें कांहीं कालानें म्हाळसापति व बाबा यांचें परस्परांवर फार प्रेम जडलें. रात्रीं बाबांच्याजवळ श्रीद्वारकामाईत कोणी निजावयास जात नसे. बाबा एकटेच निजत असत. नंतर बऱ्याच वर्षांनीं म्हाळसापति बाबांच्याजवळ श्रीद्वारकामाईत निजावयास जाऊं लागले. बाबा समाधिस्थ होईपर्यंत म्हाळसापतींचा हा नित्यक्रम ३०-४० वर्षें चालूच होता.

म्हाळसापति हे गुप्त भक्तमाणिक होते. ते जरी संसार करीत होते, तरी ते पूर्ण वैराग्यशील होते. त्यांना श्रीमल्हारदेवाचा दृष्टांत झाल्यापासून त्यांनीं सोनारकी सोडली. नंतर ते भिक्षेवर जें मिळेल, त्यांत निर्वाह करून संतोष मानीत असत. पुष्कळ मंडळींना त्यांच्या गरिबीची कींव येत असे. त्यामुळें ते त्यांना पैसे द्यावयास जात. पण पैशाच्या लालुचीस ते कधींही भुलले नाहींत. बाबा सांगतील तरच पैसा अगर दुसऱ्यानें दिलेली कोणतीही वस्तु स्वीकारावयाची, नाहीं तर नाहीं. बाबा ही त्यांची निस्पृहवृत्ति पाहून त्यांना कोणतीही वस्तु अगर पैसा घेण्याचा आग्रह करीत नसत. अति आग्रहामुळें एखाद्या वेळीं पैसा अगर एखादी वस्तु घेणें भाग पडलें, तर त्याचा उपयोग ते संसारकार्यांत कधींही करीत नसत. देवधर्माकडे किंवा गरीबगुरिबांकडे करीत. एकदा बाबांनीं परीक्षा पाहण्याच्या मिषानें म्हणा, अगर अन्य कारणानें म्हणा, त्यांना पैसे घेण्याचा आग्रह केला. म्हाळसापतींनीं पैसे घेण्याचें नाकारलें व म्हणाले, " बाबा मला पैसा वगैरे कांहीं नको. मला फक्त तुमचे पाय पाहिजेत. " खरोखरच केवढी ही निस्पृहता ! केवढी ही निरिच्छता ! केवढा तरी वित्ताचा वीट ! व वित्तैषणेची हत्या ! व सद्गुरुप्रेम !

म्हाळसापति हे जेजुरीच्या खंडेरायाची वर्षांतून एक वेळ वारी करीत. त्यांचें कुळदैवत खंडेराव. त्यावर त्यांचें अप्रतिम प्रेम व अलोट निष्ठा. तितकेंच त्यांचे श्रीसमर्थसद्गुरु बाबांवरही प्रेम व तितकीच अप्रतीम निष्ठा. बाबांचे पाय त्यांनीं बाबा समाधिस्थ होईपर्यंत सोडले नाहींत. बाबा समाधिस्थ झाल्यावर म्हाळसापतींनीं चार वर्षांनीं देह ठेवला.

श्रीखंडेरायांनीं व बाबांनीं त्यांना वेळोवेळीं दिलेले दृष्टांत व अनुभव खरोखरच हृदयस्पर्शी व उद्बोधक आहेत. म्हाळसापतींचें शारीरिक, वाचिक व मानसिक तप कडकडीत होतें. त्यांचें त्यांच्या इंद्रियांवर प्रभुत्व होतें. संसारांत राहून ते कमलपत्राप्रमाणें संसारविषयापासून अलिप्त होते.

म्हाळसापतींनीं कर्मयोगाचा किंवा ज्ञानयोगाचा अभ्यास न करतां किंवा कोणत्याही प्रकारची विद्या संपादन न करतां त्यांच्या ठिकाणीं खंडेराय दृष्टांतानें व बाबांच्या दर्शनानें एकदम नैराश्य, वैराग्य ज्ञान, व निष्ठा कशी उत्पन्न झाली ?

उदयजच्चि दिनकर । प्रकाशच्चि आते आंधार ।
कां दीपसंगें कर्पूर । दीपच्चि होय ॥ ९४५ ॥
तैसें जया कोणासी दैवें । गुरुवाक्य श्रवणाचि सवें ।
द्वैत गिळोनि विसंबे । आपणया वृत्ती ॥ ९८८ ॥

कामा वचनाचिये भेटी । सरिसाची पैं किरिटी ।
वस्तु होऊनि उठी । कवणी एक जो ॥ ८९१ ॥

पुत्र वित्त परलोक । यया तिहींचा अभिलाष ।
घरीं होय पाइक । हेही झाले ॥ ८९३ ॥

श्रीज्ञानेश्वरी, अ. १८

यावरून जा कोणी भाग्यनिधि असेल, त्यालाच परमेश्वरकृपेनें व सद्गुरुवचनश्रवणानें उपरती होते. त्याला संसारत्यागाची, शास्त्राची, विद्वत्तेची व इतर कोणत्याही साधनांची अवश्यकता नसते. पण असे भाग्यनिधि बोटावर मोजण्याइतके सुद्धा मिळणें कठीण.

श्री. म्हाळसापति यांपैकींच एक महात्मे म्हणावयाचे !

ठाणें, मिति कार्तिक शु. ९ गुरुवार शके १८५६ } संतपदरजःकण दासानुदास **बाबांचें बाळ**

## १. श्री. म्हाळसापतींचा स्वभाव व धंदा

माझ्या पूर्वपिढीपासून श्रीमल्हारचें संस्थान माझ्या वडिलांकडे होतें. परंतु नंतरीं माझे वडील चिमणाजीपंत यांना लवकरच देवाज्ञा झाली, तेव्हां त्यांना रामजी, मी आणि हरिभाऊ अशीं तीन अपत्यें होतीं. पुढें संस्थान चुलत्याकडे गेलें. आमची पोटापाण्याची सोय आमची मातुःश्री गंगूबाई ह्या कशा तरी करीत होत्या. मी थोर झाल्यावर लोक मला म्हणत कीं, कांहीं तरी उद्योग कर; असा रिकामा फिरूं नकोस. तेव्हां लोकांच्या आग्रहावरून धंदा करूं लागलों. परंतु मला त्यांत यश येईना. शेराचा सव्वा शेर न होतां शेराचा पाऊण शेर होऊं लागला. असें कां होतें, म्हणून काळजी करीत असें. परंतु एके दिवशीं मला श्रीमल्हारदेव यांनीं असा दृष्टांत दिला कीं, तुझी काठी मोडली. मोराचीं पिसें गळालीं. परंतु बोलून-चालून मीं अज्ञान. तेव्हां देवानें माझ्या स्वतःच्या अंगांत संचार करून मला म्हणाले कीं, " मला तुझ्या घरांत यावयाचें आहे. तर तूं मला ने." तेव्हां लोकांनीं देवाचें संस्थान चुलत्याच्या घरून आणवून माझ्या घरीं बसविलें व मी पूर्वीप्रमाणें देवधर्म चालू केला. इतकें जरी झालें, तरी मी धंदा करीत असें. परंतु देवानें मला दुसऱ्यानें असा दृष्टांत दिला कीं, "एक ब्राह्मण आला आणि म्हणाला कीं, "कां रे बुवा, तूं धंदा केला नाहींसतर तुझें पोट भरणार नाहीं का ?" तेव्हां मीं त्यांना सांगितलें कीं, "मी आजपासून कांहींच उद्योगधंदा करणार नाहीं !" तो ब्राह्मण म्हणाला, "ठेव माझ्या पायावर हात." त्याप्रमाणें मी त्याच्या पायावर हात ठेवून दुसऱ्या दिवसापासून अजिबात धंदा सोडून देऊन सर्व काळ देवधर्मांत घालवूं लागलों.

माझे मित्र रा. रा. काशीराम शिंपी, रा. रा. आपाजी जागले, ह्यांच्या स्वभावाशीं माझा स्वभाव मिळता असल्यामुळें आम्ही बालवयांत व तरुणपणीं जगाच्या नियमाप्रमाणें, नानाप्रकारचे खेळ खेळलों. आमच्या घरीं कोणत्याही जातीचा पाहुणा आला, तर आम्ही त्यांचा पुढीलप्रमाणें

आदरसत्कार करीत असूं. गोसावी आला, तर नमोनारायण म्हणावें. बैरागी आला, तर त्याला जयराम म्हणावें. फकीर आला तर जयसाई असें म्हणावें. ह्या वर सांगितलेला सत्कार मीं करावयाचा, त्याप्रमाणें माझे मित्रही करीत असत. रा. रा. काशीरामशेठ शिंपी यांनीं शिधापाणी द्यावें. आपाजी पाटील यांनीं सरपणभांडीं वगैरे सामान द्यावें व मी गरीब असल्यामुळें मीं पायवंदन करावें. ( हातपाय चेपणें वगैरे )

## २. बाबांचें प्रथम शिरडींत आगमन व दर्शन

माझा नित्य नेम चालला असतांना एके दिवशीं मी शिर्डींतील मल्हारदेवाच्या पूजेकरितां गेलों असतां राहात्याच्या बाजूनें एक मुसलमानी लग्नाची वरात आली होती. त्यांत एक मुसलमान साधु एकदम देवाच्या देवळांत आले; त्या वेळीं मी मल्हारदेवाची पूजा करीत होतों, तों पाठीमागें कोणीं आल्याचा भास झाला म्हणून वळून पाहिलें तों मुसलमान साधु ( फकीर ). तेव्हां मी नेहमीच्या वहिवाटीप्रमाणें आवाजी साईमहाराज असें म्हणून मी त्यांना ( फकिरांना ) नमस्कार करून बसविलें. मग माझी पूजा संपल्यावर मी व फकीर यांनीं चिलीम ओढली व त्यांना मी बरोबर घेऊन गांवांतील मशिदींत बसविलें. त्याप्रमाणें मी आपल्या मित्रमंडळीची गांठ घालून दिली. मग बाबा व मित्रमंडळी आम्ही दररोज गाणेंबजावणें करीत नाना प्रकारचे खेळ खेळत असूं; एखाद्या वेळेस आम्ही बाबांसह पूर पाहावयास जात असूं. असे आम्ही आनंदानें दिवस काढीत असतां, त्याच वेळेस शिर्डी मुक्कामीं देवीदास व जानकीदास असे दोन सत्पुरुष पूर्वीपासून राहत होते, ते आमच्याबरोबर बाबांशींसुद्धा देवाधर्माच्या गोष्टी बोलत असत.

## ३. बाबा लिंबवृक्षाखालीं आसन घालून केव्हांपासून बसूं लागले ?

बाबांची समाधि हल्लीं ज्या ठिकाणीं आहे, त्याच वाडयाच्या पश्चिमेस साठेसाहेबांचा वाडा आहे. त्या वाडयांत एक लिंबाचें झाड आहे. कांहीं महिन्यांनीं त्या लिंबाच्या झाडाखालीं बाबांचें आसन आलें.

## ४. मौला जबरअल्लीची जबरदस्ती

कांहीं दिवस बाबा त्या लिंबाच्या झाडाखालीं रहात व कांहीं दिवस मशिदींत राहत. असें होतां होतां एके दिवशीं बाबा गांवांतील लोकांना म्हणाले कीं, तुम्ही या ठिकाणीं खणा, त्या ठिकाणीं माझ्या गुरूची समाधि आहे. त्याप्रमाणें लोकांनीं उकरून पाहिलें, तर खरोखर समाधि निघाली. मग गांवांतील लोकांनीं जागा साफसुफ करून त्या समाधीवर गलेफ व फुलें टाकून पूजा केली व त्या दिवसापासून तेथें दर गुरुवारीं यात्रा भरत असे.

## ५. बाबांच्या गुरुरायांची समाधि

असें कांहीं दिवस चालल्यावर परत शिरडी मुक्कामीं एक जबरअल्ली नांवाचे मौला आले व ते बाबांना म्हणत कीं, तूं माझा चेला हो; परंतु बाबांच्या मनांतून त्या मौलाचा चेला व्हावयाचें न हतें; परंतु त्यांनीं बाबांना बळेंच राहतें मुक्कामीं नेलें. जेव्हां बाबा शिर्डीहून राहते मुक्कामी गेले, तेव्हां त्यांच्या मित्रमंडळींना करमेना. म्हणून त्यांनीं विचार करून ते गांवांतील पांचपंचवीस लोक बरोबर घेऊन राहते मुक्कामीं गेले व मी (भगत) म्हणालों, "बाबा शिर्डीस चला;" तेव्हां बाबा म्हणाले, "तो फार द्वाड आहे. मला कांहीं तो शिर्डीस जाऊं देणार नाहीं." तेव्हां मी (भक्तांनीं) बाबांना परत शिरडीस आणलें. तेव्हां तो जबरअल्ली मौला शिर्डी मुक्कामीं आला. त्या वेळीं शिर्डीतील लोकांनीं त्याची चांगलीच धिंड काढून त्यास गांवांतून घालवून दिलें.

## ६. बाबांचे रहाते, निघोज व निमगांव ठिकाणीं येणें

बाबा कधीं राहात्यास तर कधीं निघोज, निमगांवांस जात येत. निमगांव येथें डेंगळे यांच्या घरीं बाबांची नेहमीं बैठक असे व रहाते येथें खुशालशेट यांच्या घरीं व गांवांतील सावकारांच्या घरीं सहज लहरीनें जात.

## ४. मौला जबरअल्लीची जबरदस्ती

कांहीं दिवस बाबा त्या लिंबाच्या झाडाखालीं रहात व कांहीं दिवस मशिदींत राहत. असें होतां होतां एके दिवशीं बाबा गांवांतील लोकांना म्हणाले कीं, तुम्ही त्या ठिकाणीं खणा, त्या ठिकाणीं माझ्या गुरूची समाधि आहे. त्याप्रमाणें लोकांनीं उकरून पाहिलें, तर खरोखर समाधि निघाली. मग गांवांतील लोकांनीं जागा साफसुफ करून त्या समाधीवर गलेफ व फुलें टाकून पूजा केली व त्या दिवसापासून तेथें दर गुरुवारीं यात्रा भरत असे.

## ५. बाबांच्या गुरुरायांची समाधि

असें कांहीं दिवस चालल्यावर परत शिरडी मुक्कामीं एक जबरअल्ली नांवाचे मौला आले व ते बाबांना म्हणत कीं, तूं माझा चेला हो; परंतु बाबांच्या मनांतून त्या मौलाचा चेला व्हावयाचें न होतें; परंतु त्यांनीं बाबांना बळेंच राहतें मुक्कामीं नेलें. जेव्हां बाबा शिर्डीहून राहते मुक्कामी गेले, तेव्हां त्यांच्या मित्रमंडळींना करमेना. म्हणून त्यांनीं विचार करून ते गांवांतील पांचपंचवीस लोक बरोबर घेऊन राहते मुक्कामीं गेले व मी (भगत) म्हणालों, "बाबा शिर्डीस चला;" तेव्हां बाबा म्हणाले, "तो फार द्वाड आहे. मला कांहीं तो शिर्डीस जाऊं देणार नाहीं." तेव्हां मी (भक्तांनीं) बाबांना परत शिरडीस आणलें. तेव्हां तो जबरअल्ली मौला शिर्डी मुक्कामीं आला. त्या वेळीं शिर्डीतील लोकांनीं त्याची चांगलीच धिंड काढून त्यास गांवांतून घालवून दिलें.

## ६. बाबांचे रहाते, निघोज व निमगांव ठिकाणीं येणें

बाबा कधीं राहात्यास तर कधीं निघोज, निमगांवांस जात येत. निमगांव येथें डेंगळे यांच्या घरीं बाबांची नेहमीं बैठक असे व रहाते येथें खुशालशेट यांच्या घरीं व गांवांतील सावकारांच्या घरीं सहज लहरीनें जात.

## ७. बाबांची १ ली लीला ( स्वतःस पुरून घेण्याची )

शिरडींच्या उत्तर बाजूला गांवापासून सुमारें तीन नंबरावर एक ओढा आहे. त्या ओढयाचें नांव सीन. त्या नाल्यावर बाबा स्वतः बसत असत. कधीं कधीं बाबा स्वतः त्या ओढयांत जाऊन सुमारें एक परसभर खड्डा खणीत व त्यांत स्वतः उभे राहून आपलें शीर तेवढें उघडें ठेवून वाळू टाकून स्वतःस पुरून घेत असत.

## ८. बाबांची वैद्यक्रिया व वेड

बाबा शिर्डी मुक्कामीं लोकांना औषधपाणी देत असत व त्याच्या योगानें मोठमोठे महारोगी नीट होत असत व गांवांत लहरीप्रमाणें जेवण घेत असत. पुढें कांहीं दिवसांनीं बाबा वेडयासारखे करूं लागले व त्याच नादांत थिल्लरीचें पाणी पीत. वाटेल त्या ठिकाणीं बसत उठत. या वागण्यावरून गांवांतील लोक बाबांना वेडे मानूं लागले. पूर्वी जी शिर्डी मुक्कामीं जीर्ण [ जुनी ] मशीद होती, त्या ठिकाणीं बाबा शयन करीत असत.

## ९. बाबांची २ री लीला ( फळीवर निजण्याची )

कांहीं दिवसांनीं बाबांना शयन करण्याकरतां नानासाहेब डेंगळे यांनीं एक फळी आणून दिली. त्या फळीचा उपयोग बाबांनीं पुढील-प्रमाणें केला. तो असा कीं, चिंध्यांचे दोन मोठे काकडे वळीत व ते काकडे खांडाला ( तुळईला ) बांधित व त्यांत ती फळी ठेवीत. ते खांड व फळी यांत अंतर सुमारें एक वीतभर असे. पुढें बाबा त्या फळीच्या दोन्ही बाजूंला पाण्यानें भरलेल्या दोन पणत्यांत दिवा लावीत व त्यांत फळीवर शयन करीत. हा दररोजचा बाबांचा नित्यनेम पाहून लोकांना फारच नवल वाटून हा खरोखर मौला फकीर नसून हा कोणी तरी सत्पुरुष असावा असें लोकांचें म्हणणें झालें व त्या फळीवर बाबा कसे जात असत व कसे खालीं येत असत हें कोणालाही समजत नसे. हा बाबांचा चमत्कार

पाहण्यास लोकांची नेहमींच गर्दी होऊं लागली. तेव्हां बाबांनीं जर सांगितल्याप्रमाणें शयन करणें व पाण्यानें भरलेल्या पणत्या पेटविणें हें बंद केलें.

## १०. श्रीरामनवमीच्या उत्सवास सुरवात

कोपरगांव येथें गोपाळराव गुंड इन्स्पेक्टर होते. त्यांचें शिर्डीस नेहमीं येणेंजाणें होतें. त्यांची बाबांवर पूर्ण श्रद्धा होती. त्यांना तीन बायका झाल्या, तरी पोटीं पुत्रसंतान नाहीं. मग बाबांच्या कृपेनें त्यांना पुत्रसंतान झालें. त्याचा मोबदला म्हणून त्यांनीं बाबांना बसण्याकरितां जी जुनी मशीद होती ती दुरुस्त करून देण्याचें मनांत आणिलें. परंतु त्यांच्यानें तें काम झालें नाहीं. तथापि हल्लीं जो रामनवमीचा उत्सव होतो, तो इन्स्पेक्टरसाहेबांनीं गांवांतील प्रमुख मंडळी व पाटील-कुळकर्णी यांचा विचार घेऊन करण्यास सुरवात केला.

## ११. श्रीसंतगंगागीर बाबा ( चांगदेव )

कापूस वडगांव (मोगलाई) येथें गंगागीर बाबा गांवोगांव नामसप्ताह करीत व त्याप्रमाणें भोजनसमारंभ करीत. त्याप्रमाणें गंगागीर बाबांनीं शिर्डी मुक्कामीं नामसप्ताह केला व नित्याप्रमाणें पारणें केलें ( भोजनसमारंभ) त्या वेळा सद्गुरु साईबाबा हे आपल्या स्वतःकरितां दोन्ही हातांत दोन मातीच्या घागरी घेऊन पाण्यास जात असत. हल्लीं ज्या ठिकाणीं श्रीसाईबाबांची समाधि आहे, त्या ठिकाणीं पूर्वी एक मोठें थोरलें पटांगण होतें. त्या ठिकाणीं मी ( श्रीमल्हारभगत ) व दुसरे कांहीं गांवांतील प्रमुख मंडळी उभे होतों. तों तिकडून गंगागीर बाबा आले, व म्हणाले "का हो, हे कोण महाराज ( साईबाबा ) आहेत ?" तेव्हां मी (भगत) म्हणालों, "हे साईमहाराज आहेत." तेव्हां त्या वेळेस बाबा घागरींत पाणी घेऊन मशीदीकडे चालले होते. तेव्हां गंगागीरबाबा भक्तांना व जमलेल्या मंडळींना म्हणाले, "हा तर हिरा असून तुम्हीं त्यांना (बाबांना) एखाद्या कस्पटाप्रमाणें मानतां !

तेव्हां तुम्हाला मनुष्याची पारख नाहीं." इतकें बोलून गंगागीरबावा श्रीसाईबाबांच्या पाठोपाठ मागें आले, तेव्हां साईबाबांनीं आपल्या हातांतील घागरी मशिदींत आणून ठेवल्या आणि तावडतोब विटकरीचा टोला हातांत घेतला आणि गंगागीरबाबांना म्हणाले कीं, ऐसे जाना ऐसे आना (वेशी-तून येणें). मग गंगागीरबावा वेशींतून आल्यावर श्रीसाईबाबांनीं "आओजी चांगदेवमहाराज" असें म्हणून त्यांना मशिदींत आणलें व नंतर मीं (म्हाळसापति) श्रीसाईबाबा व चांगदेव (गंगागीरबावा) या दोघांनीं चिलीमपाणी ओढली.

## १२. श्रीआनंदनाथ महाराज

त्याचप्रमाणें अक्कलकोटचे अनंत (आनंदनाथ) महाराज हे येवलें एथें आले होते. त्या ठिकाणीं शिर्डीची मंडळी रा. रा. नंदराम मारवाडी, दगडू गायके, हे त्यांना भेटण्याकरितां गेले होते. तेथें अनंतमहाराजांची भेट झाल्यावर शिर्डीची मंडळी घरीं येण्यास निघाली, त्याबरोबर अक्कलको-टच्या महाराजांचे शिष्य आनंदनाथमहाराज त्यांच्या गाडींत बसून शिर्डी मुक्कामीं आले व त्यांनीं श्रीसाईमहाराजांना पाहिल्याबरोबर म्हणाले, "अरे, हा तर हिरा आहे. तुम्हाला चांगलीच मनुष्याची पारख आहे." इतकें ते गांवांतील लोकांना बोलले.

## १३. जुनी मशीद दुरुस्त करण्याचें काम

रा. रा. नानासाहेब चांदोरकर यांची बाबांची जीर्ण मशीद बांध-ण्याची इच्छा होती. त्याप्रमाणें ते काम सुरू करणार, परंतु श्रीसाईबाबा तें काम सुरू करूं देईनात. असें होतां होतां एके दिवशीं मी (श्री म्हाळसा भगत) दररोजच्या नियमाप्रमाणें भिक्षा मागण्यास गावांत चाललों होतों; तेव्हां ते सहज फिरत फिरत मशिदीवरून गेले, त्या वेळेस मशीदीच्या बाहेर नानासाहेब उभे होते. ते मजजवळ ही मशिदीची गोष्ट बोलणार, तों श्रीसाई-

बाबांनीं मला वर ( मशिदींत ) बोलावलें, आणि मग मी बाबांना ओढण्याकरतां चिलीम भरली असतां बाबा म्हणाले, “का रे म्हाळसापति, तो बाहेर कोण उभा आहे ?” तेव्हां मी म्हणालों, “नानासाहेब चांदोरकर आहेत.” “होय का ! अरे, म्हाळसापति मला तुला विचारावयाचें आहे, हा बाहेर नाना आहे ना ! तो म्हणतो कीं, बाबा, मी नवीन मशीद बांधून देतों. मग त्याला नवीन मशीद बांधून द्यावयाची आहे. हा आपली जुनी बरी आहे ? कशाला नवी पाहिजे बरें ? बांधींना का नवी, आपल्या दोघांना बरी होईल, उठा बसावयास, वेळ पडल्यास झोंपावयास.” मग असा आमचा दोघांचा विचार चालला व शेवटीं असें ठरलें कीं, नवी मशीद बांधावयाची. मग बाबांनीं माझ्याकडून नानासाहेबांना हाक मारली, आणि लागलीच एक नारळ आणून फोडला. कामास सुरवात केली; काम जरी सुरू केलें तरी बाबांची लहर फिरली कीं ते त्यांना तें काम करूं देत नसत. असें करतां करतां हल्लीं ज्या मशिदींत बाबांचा फोटो आहे, त्या मशिदीचें काम अशाप्रकारें पुरें झालें.

## १४. बाबांची पूजा

बाबांची पूजा मी करीत होतों. परंतु बाबांच्या कपाळाला गंध लावीत नव्हतों. नंतर बाबांनीं मला असा दृष्टांत दिला कीं, बाबांच्या कपाळास गंध, दोन्ही हाताला उटणें लावलेले असे बाबा मला दिसले. लागलीच दुसऱ्या दिवशीं मी नित्याप्रमाणें उठून देवपूजा करून बाबांची पूजा केली व बाबांच्या कपाळास गंध लावून भंडार लाविला. त्याचप्रमाणें हातास उटणें लाविलें. त्या दिवसापासून बाबा कपाळाला गंध लावून घेऊं लागले. ह्यापूर्वी फक्त गळ्यालाच गंध लावण्याची चाल होती.

## १५. संगमनेरचे काजीसाहेब

परंतु ही कपाळास गंध लावण्याची चाल मुसलमान लोकांना आवडेना व त्यांनीं बाबांना ह्या बाबतींत म्हणावें कीं, “बाबा

कपाळाला गंध लावून घेऊं नका.'' परंतु बाबा मुसलमानांचें न ऐकतां माझकडून पूजा करून घेत. शेवटीं मुसलमान लोकांनीं काजीसाहेबांना संगमनेराहून बोलावलें व त्याप्रमाणें काजीसाहेब शिर्डी मुक्कामीं आले व लोकांचा विचार घेतला, व त्यांत असें ठरलें कीं, पाहूं कोण आज बाबांच्या कपाळाला गंध लावतो व पूजा करतो ! जो पूजा करील त्याला आम्हीं आज पूजेलाच अडथळा करूं. मग पाहूंया कसा म्हाळसापति बाबांची पूजा करतो ! इतक्यावर तो जर पूजा करील, तर आम्हीं त्याला चांगलाच मार देऊं म्हणजे आजपासून बाबांच्या कपाळाला गंध लावणें, तसेंच हाताला उटणें लावणेंच बंद होईल. असा त्यांचा विचार ठरला व त्याप्रमाणें ते त्या व्यवस्थेस लागले. परंतु बाबांची करणीच कांहीं विलक्षण होती. त्यांच्यापैकीं रा. रा. भाऊराव तांबोळी हे माझे मित्र होते. त्यांनीं झालेली सर्व हकीकत मला कळविली आणि म्हणाले कीं, उद्यां आपल्या बाबांच्या पूजेला अडथळा होणार आहे. परंतु बोलूनचालून मी भगत; मला काय करावयाचें ? मी आपल्या दररोजच्या नियमाप्रमाणें श्रीखंडेरावांची पूजा करून शनि, गणपति, महादेव व मारुति ह्यांची पूजा करून मशिदीवरून जाऊं लागलों व बाबांच्या नांवाची पूजा होळीवर केली. आणि घरीं जाऊं लागलों. तोंच बाबांनीं "म्हाळसापति इदर आव, आज तूं असा कां बाहेरून चाललास ?" "बाबा, मजवर काजीसाहेब रागावतील म्हणून मी आज मशिदींत न येतां बाहेरून चाललों." "लगाव दे संदल ! ह्यां लगाव, ह्यां लगाव, ह्यां लगाव (कपाळास, मस्तकास, गळयाला, व हाताला) भंडार व चंदनकु कोन नाम रखेगा ? (भंडार व चंदन याला कोण नांव ठेवूं शकणार ?)" ह्याप्रमाणें बाबांनीं मजकडून पूजा करून घेतली. तेव्हां काजीसाहेबांनीं आपला रस्ता मुकाट्यानें धरला. ह्याप्रमाणें मी बाबांची दररोज पूजा करूं लागलों.

## १६. सीताराम डेंगळे व बाबांची पूजा

असें कांहीं दिवस चाललें असतां एके दिवशीं रा. रा. सीताराम डेंगळे यांनीं विचार केला कीं, आपण बाबांची पूजा करूं; परंतु माझ्या-

शिवाय बाबा कोणास पूजा करूं देत नसत. जर इतकें करून कोणी आलाच, तर त्यांनीं त्यास असें म्हणावें कीं, ह्या खांबाची पूजा कर. माझी पूजा तुम्हांला मी सोनार करूं देणार नाहीं. जेव्हां बाबा त्याला असें सांगत, तेव्हां त्याला फारच वाईट वाटे व पाहूं या बाबा भक्ताशिवाय दुसऱ्याच्या हातून पूजा करून घेतात कीं नाहीं ? म्हणून सीताराम डेंगळे पूजेच्या सर्व सामानासह निमगांवाहून शिर्डीस बाबांची पूजा करण्यास आले व ते हळूच बाबांच्या मस्तकावर पाणी, गंध शिंपडूं लागले. तोंच बाबा त्याला धरावयास लागले. ते पळून गेले. परत दुसऱ्या दिवशीं पूजेला आले व नकळत पूजा करून जावूं लागले. याप्रमाणें त्यांनीं पूजा सुरू केली व त्या दिवसापासून बाबांची पूजा कोणीही करूं लागले. ह्यापूर्वीं बाबा मजकडूनच पूजा घेत व बाबांना पण दुसऱ्याची पूजा आवडत नसे. रा. रा. सीताराम डेंगळे यांच्या मनांत बाबांची पूजा करण्याची इच्छा होती. परंतु बाबा मजशिवाय कोणासही पूजा करूं देत नसत असें त्यांस माहित होतें, म्हणून त्यांनीं सहज गोष्ट दगडूभाईजवळ काढली. तेव्हां तो म्हणाला, "खुशाल पूजा करा." एवढें म्हटल्याबरोबर त्यांनीं दगडूभाईस सपके देऊं केले व त्याप्रमाणें त्यांनीं केलें. ह्याप्रमाणें बाबांची पूजा सर्व लोक करूं लागले. शिवाय माझी पूजा नेहमीप्रमाणें चालू होती.

## १७. श्री. मेघा व बाबांची पूजा व आरति

रा. रा. हरि विनायक साठे हे बाबांच्या भेटीस नेहमी येत-जात होते. त्यांचा मेघा ह्या नांवाचा एक गुजराती ब्राह्मण होता, तो सात्त्विक मनुष्य होता. त्याचा दररोजचा नेम असा होता कीं, खंडेराव, शनि, मारुति, गणपति व महादेव यांची पूजा करावयाची व त्याप्रमाणें तो बाबांची पूजा करी; परंतु त्याची स्थिति नवीन रा. रा. सीताराम डेंगळे यांच्याप्रमाणें झाली, पुढें तो बाबांची आरति करीत असे; परंतु बाबा त्याला आरति करूं देत नसत, तरी तसाच पंचारति घेऊन मशिदीच्या पायरीजवळ राहून आरति करीत असे. पुढें तो मशिदींत येऊन आरति करूं लागला.

## १८. श्री. साठेसाहेब यांचा बाबांना नैवेद्य

रा. रा. हरि विनायक साठे यांची इच्छा होती कीं आपण दररोज बाबांना नैवेद्य करीत जावा, म्हणून त्यांनीं ती गोष्ट सहज मजपाशीं काढली. परंतु ती गोष्ट मीं कबूल केली नाहीं. तेव्हां एके दिवशीं साठेसाहेब व माधवराव देशपांडे यांनीं मशिदींत बाबांना ती गोष्ट कळविली. आणि त्याच्याबद्दल आम्हीं दरमहा पांच रुपये देत जाऊं. त्याप्रमाणें बाबांच्या सांगण्यावरून मी दररोज नैवेद्य घेऊन जाण्याचें कबूल केलें. परंतु याशिवाय दररोज माझा नैवेद्य बाबांना जात होता. पुढें कांहीं दिवसांनीं साठेसाहेब शिर्डी मुक्कामीं रहावयास आले व ते स्वतः नैवेद्य नेऊं लागले.

## १९. श्री बाळासाहेब भाटे व म्हाळसापतीस मदत

रा. रा. बाळासाहेब भाटे हे बाबांच्या दर्शनास येत जात होते त्या वेळेस बाबांनीं मला सांगितलें कीं, हा (बाळासाहेब) आपला भाऊ आहे. त्याचप्रमाणें बाळासाहेबांनीं पण मला भाऊच मानलें. मग बाळासाहेबांच्या मनांत आपण मला कांहीं तरी मदत करावी असें आलें; परंतु मीं ती मदत घेण्याचें नाकारलें. पुढें कांहीं दिवस गेल्यावर बाळासाहेबांनीं वरील गोष्ट बाबांजवळ काढिली, तेव्हां बाबा म्हणाले, "तुम्हीं मदत करीत जा व मला ती मदत घेण्यास सांगितलें. कारण तुम्ही भाऊच आहांत." पुढें कांहीं दिवस मदत घेत साठेसाहेबांच्या मदतीबद्दल व भाटयांच्या मदतीबद्दल दररोज वीस भाकरी व माझा नैवेद्य बाबांना जात होता. पुढें भाटे हे बाबांच्या चरणापाशीं येऊन राहिले व त्याच ठिकाणीं कैलासवासी झाले.

## २०. जेजुरीचे श्रीखंडेराय व बाबांची लीला

माझा नियम असा होता कीं, दरवर्षीं म्हणजे माघ शु॥ पौर्णिमेस खंडेरावाची पालखी श्रीक्षेत्र जेजुरीस न्यावयाची. पण त्या सालीं त्या ठिकाणीं प्लेग चालू होता व सरकार लोकांना कोरांटी (क्वारंटाइन)

देत होते. तरी पण मीं जेजुरीस पालखी नेण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं निघणार म्हणून आदल्या दिवशीं मी बाबांना विचारण्याकरितां गेलों. तेव्हां बाबांनीं मजजवळ सव्वा रुपया दिला; व म्हणाले, 'हा सवा रुपया घे. यांत जत्रा कर; खर्च कर अगर करूं नकोस' त्याचप्रमाणें एक चिर्लीम ओढण्यास दिली व म्हणाले 'ही चिर्लीम घे म्हणजे तुला व मला ओढण्यास होईल. याप्रमाणें बाबांना विचारून मी जेजुरीस जाण्यास निघालों. माझ्याबरोबर गांवांतील पांचपंचवीस लोक होते व बाबा मला वाटेस लावण्याकरितां थेट कोऱ्हाळे वेसपर्यंत आले. पुढें मी आपला रस्ता सुधारला व बाबा परत मशिदींत आले. पुढें दर मुक्काम करीत मी जेजुरीस पोहचलों. गांवांत भयंकर प्लेग असल्यामुळें लोक फारच घाबरले. तेव्हां मी पालखीला पाठ लावून चिंतातुर बसलों. तेव्हां पाठीमागें कोणी आल्याचा भास झाला. मी सहज पाहिलें तों मला बाबा दिसले व तावडतोब गुप्त झाले. तेव्हां मला थोडासा धीर आला व मी सर्व हकीकत आपल्या मंडळीला सांगितली व मी आणि सर्व मंडळींनीं खंडे-रावाचा व बाबांचा घोष चालविला. त्या चार दिवसांत कोणाच्याही केसास धक्का लागला नाहीं. मग माझी व सर्व मंडळीची यात्रा आनंदित होऊन आम्हीं शिर्डी मुक्कामीं आलों. तेव्हां बाबा म्हणाले, " काय म्हाळसापति, जत्रा चांगली झाली ना ! मी पण जत्रेला आलों होतों. तुम्हीं नव्हतां का पालखीला पाठ लावून बसलां ? त्यावेळींच मी आलों होतों. तेव्हां मला फारच आनंद झाला."

## २१. जेजुरीची यात्रा व बाबांची लीला.

दुसऱ्या एके वेळेस आपल्या दरवर्षाच्या नियमाप्रमाणें जेजुरीची यात्रा करून मी परत शिर्डीस येण्यास निघालों. परंतु एके दिवशीं रात्र झाल्यामुळें मंडळींचा व माझा रस्ता चुकला; त्या वेळीं फक्त कुत्र्याचा आवाज येई व तावडतोब बंद होई. म्हणून रस्ता सांपडण्यास अडचण पडे. त्या आवाजाच्या

धोरणानें आम्हीं एका गांवीं येऊन पोहचलों. तेव्हां गांवांतील लोक मला म्हणाले, "इतक्या रात्रीं तुम्ही कसे आलांत ? त्या ठिकाणीं जनावरांची व चोरट्यांची फार भीति आहे. आम्ही तर त्या रस्त्यानें उशीरा रात्रीं वागत नाहीं. तेव्हां मला वाटलें कीं आपणास देवांनीं त्या गांवीं पोंहचविलें.

## २२. जेजुरीच्या यात्रेंत पाण्याचा दुष्काळ व बाबांची लीला

एका सालीं पाण्याचा फार दुष्काळ पडला होता. तरी आपल्य दरवर्षाच्या नियमाप्रमाणें मी जेजुरीस आपली मित्रमंडळी व गांवांतील लोक बरोबर घेऊन गेलों होतों. कडे-पठाराच्या रस्त्यानें एक जुनी वाव (विहीर) आहे. त्या ठिकाणीं मंडळी जात असतां त्यांचा स्नान करण्याचा विचार ठरला. परंतु पाणी नव्हतें म्हणून मी आपल्या हातांतील लोटी घेवून "अक्षर मंतर" " देवा देवा, पाणी दे," असें म्हणालों व त्याचप्रमाणें बरोबरांच्या मंडळीस करावयास लाविलें. तेव्हां खरोखरीच लोटीभर पाण मिळालें. तेवढ्या लोटींत मी शौचास जाऊन आलों. आतां देवा मी असाच पूजा–दर्शनास येऊं का म्हणून मीं पुन्हा मागीलप्रमाणें मंत्र केला. तेव्हां खरोखरच एक पाण्याचा झरा लागला व सर्व मंडळींनीं त्या झऱ्यांतील पाण्यानें स्नान केलें. परंतु मजा अशी झाली कीं, जे यात्रेकरू होते, ते मला विचारीत कीं, आपण स्नान कोठें केलें ? तेव्हां मी म्हणालों, 'तुम्हास स्नान करावयाचें आहे काय ? ' तेव्हां लोक हंसत, व पुढें चालत. परंतु त्यांना पाणी कांहीं दिसेना. कां दिसेना तें मला सांगतां येणार नाहीं.

## २३. जेजुरीची यात्रा व दगा व बाबांची लीला

एक सालीं मी आपली जेजुरीची यात्रा संपवून शिर्डीस येण्यास निघालों. तों माझ्या अंगांत देवांनीं (खंडेरायांनीं) एकाएकी संचार केला व मी म्हणालों कीं, बाबानों, आपण सर्वजण जमून चला. आणि माझ्या

नांवाचा मात्रगजर करीत चला. कारण पुढें दगा आहे. एवढें सांगितलें आणि श्रीखंडेरायाची स्वारी आपल्या ठिकाणावर गेली. मी परत शुद्धी-वर आलों. मग सर्व यात्रेकरू जमून चालले. तों दिव्याच्या घाटांत सात चोर आपापल्या हातांत कुऱ्हाडी घेतलेल्या आणि कर्नाटकी काळ्या घोंगड्या पांघरलेले आम्हांला दिसले. परंतु मी श्रीखंडेरायाचा धांवा करून त्यांच्या अंगावर भंडाऱ्याच्या तीन मुठी फेकल्या. त्याबरोबर ते साती चोर जवळच्या रानांत मुकाट्यानें माझ्याबरोबरच्या यात्रेकरूंना कोणत्याच प्रकारचा त्रास न देतां निघून गेले. याप्रमाणें आपलें संकट टाळून मी घाट ओलांडून आपल्या रस्त्यास लागलों व गांवीं जाण्यास निघालों. त्या दिवशीं रविवार होता, परंतु लोक ऐकेनात. म्हणून आम्ही तसेच शिर्डीस जाण्यास निघालों व पालखांतील देव कोठें आहे म्हणून मजबरोबरचे लोक पाहूं लागले तों, देव त्यांना सांपडेना. मग शेजारी एक व्हलम भगत ह्यांची पालखी होती. कदाचित् न जाणो. ह्या पालखींत देव नेले असतील म्हणून ती पालखी पाहिली, परंतु त्या पालखींत देव नाहीं. मग आपल्या पालखीजवळ कोण बसले होते, त्याचा तपास करूं लागलों. तपासाअंतीं असें वाटलें कीं कदाचित् व्हलम भक्ताच्या ब्राह्मण कारकुनानें तर नाहीं देव घेतले? म्हणून त्यांना पण मंडळींनीं विचारलें, परंतु तो म्हणाला ‘ मला कशाला पाहिजे देव? पण देव कोठें गेले हें मला माहित होतें; परंतु मी कांहींच बोललों नाहीं; मग मंडळी म्हणाली कीं, शिर्डीला नुसतीं लांकडें वाहून न्यावयाचीं का? अगोदर देवाचा तपास लावा, मग घरचा रस्ता धरा. इतक्यांत माझ्या अंगांत खंडेरायाच्या स्वारीनें संचार केला, व म्हणाले ‘ कां रे, आज कोण वार आहे? माझा वार असतां मग मला घेऊन कोठें जातां? मी कडेपठाराच्या डोंगरावर शिकार खेळत आहें. मी शिकार खेळल्यावर शिर्डीस येतों, आतां तुम्हीं जा. मग शुद्धिवर आलों व मंडळी पालखी उचलून शिर्डीस जाण्यास निघाली, तों दर मुक्काम करीत यात्रेची मंडळी शिर्डीच्या खंडेरायाच्या मंदिरांत आली. जेजुरीची यात्रा आली हें गांवांतील लोकांना

समजलें. त्याप्रमाणें सखाराम गोंदकर हे पण आले; त्यांनीं दर्शन घेतलें. तों त्यांना पालखींतील सर्व देव दिसले. तेव्हां ते म्हणाले, 'का रे, तुम्हीं म्हणाला कीं, भक्तांचे देव चोरीस गेले. ते पहा भक्तांचे सर्व देव पालखींत आहेत. तुम्हांला डोळेच नाहींत. उगीच कांहीं तरी गप्प उठवितां !' यात्रेची मंडळी सखाराम गोंदकरास बोलूं लागली कीं, देव कोठें आहेत ? तेव्हां तो म्हणाला, 'चला, मी तुम्हाला देव दाखवितों. असें म्हणून त्यानें सर्व मंडळींना पालखींतील देव दाखविले.

## २४. जेजुरीची यात्रा व पारनेर पोलीस

दरवर्षाच्या नियमाप्रमाणें मी आपली यात्रा आटोपून शिर्डीस येण्यास निघालों, तो दर मुक्काम करीत असतां पारनेर मुक्कामीं रात्रीं आलों. आमच्या यात्रेचा थाट फार निराळा होता. आमचे डफ व वाजंत्री मांग होते.ते गांवांतून वाजवीत चालले होते. तेव्हां शहराच्या नियमाप्रमाणें रात्रीचे गस्त घालणारे पोलिस शिपाई त्यांना आडवे आले व म्हणाले, 'तुम्हीं कोण व काठें जावयाचें ? वाजंत्रीं कोणत्या जातीचे आहेत ?' वाजंत्री म्हणाले, 'कां ? आम्ही जेजुरीच्या यात्रेस गेलों होतों. यात्रा करून आम्हीं शिर्डीस चाललों. आमची जात ( वाजंत्र्यांची ) मांग आहे.' तेव्हां पोलिस म्हणाले, 'पास दाखवा नाहीं तर येथें बसून रहा.' असें म्हटल्या-बरोबर ते मांग रडावयास लागले.तेव्हा मार्तंड शिंपी व मी म्हणालों, 'घाबरूं नका. तुम्हीं जा त्या पोलिसाबरोबर. बोलून आम्हीं त्याची व्यवस्था करूं,' असें सांगितलें. शहराच्या नियमाप्रमाणें त्या मांगांना धरून नेलें. लगेच सकाळ झाल्याबरोबर मार्तंड शिंपी व मी मामलेदारसाहेबांस भेटलों व म्हणालों, 'हे आमचे मांग वाजंत्री आमच्या ताब्यांत १५ दिवस असतात; म्हणून आम्हीं त्यांचा पास काढला नाहीं.'तेव्हा मामलेदार म्हणाले, 'तुम्हीं त्यांचा पास काढा.' तेव्हां मी कुलकर्ण्याकडे गेलों व वाजंत्र्यांचा पास मागूं लागलो. कुलकर्णी म्हणाले, 'बसा. मी तुम्हांस पास देतों.' असें म्हणून एवढ्या वेळांत त्यानें आपला कुलकर्णीपणाचा सपाटा दाखविला. तो त्या

मांगास म्हणाला, "एवढें लांकूड फोडा, तोंपर्यंत मी तुमचा पास लिहितों" असें म्हणून त्यांनीं त्यांच्याजवळ कुऱ्हाड दिली. आणि कुळकर्णीआप्पा मजबरोबर व इतर मंडळीशीं बोलत बसले. इकडे बाहेर जसें नक्की झालें कीं, मांग लांकूड फोडावयास लागले. दोनतीन कुऱ्हाडीचे घाव लांकडावर मारतात तोंच कुऱ्हाडीचा दांडा मोडला, म्हणून त्यांनीं दुसरी कुऱ्हाड त्यांच्याजवळ दिली. पहिल्या कुऱ्हाडीची जी व्यवस्था झाली. तीच दुसऱ्या कुऱ्हाडीची झाली. तेव्हा कुळकर्णी म्हणाला, " तुम्हांला देव लांकूड फोडूं देत नाहीं. " असें म्हणून त्यानें कांहीं एक उशीर न करितां पास लिहून दिला. आणि प्रसादाकरितां पोपया वगैरे मजजवळ दिल्या. पास मिळाल्या-बरोबर आमची मंडळी गांवीं जाण्यास निघाली. रस्त्यामध्यें मार्तंडराव शिंपी यांनीं मुद्दाम लहरीनें ' मला हींव वाजलें रे मल्हारीदेवा' असें म्हणत तो रस्त्यानें मंडळीला रमवीत चालला होता. तेव्हां एकदम आवाज आला कीं, 'विस्तव आहे रे विस्तव आहे.' आवाज ऐकल्यावर मार्तंडराव व मी ज्या बाजूला आवाज आला त्या बाजूला गेलों. तों त्या ठिकाणीं एक म्हातारे बाबा आगटीजवळ शेकत बसले होते. आम्ही पण त्या ठिकाणीं शेक-ण्यास बसलों. तेव्हां त्या म्हाताऱ्या बाबानें मला विचारलें कीं, तुम्हाला कांहीं मंत्रबिंत्र येतो काय ? तेव्हां लागलीच मी हातांत एक काडी घेऊन मंत्र टाकण्यास सुरवात केली. तों म्हाताऱ्या बाबाच्या गळ्याजवळ एक लहानशी गांठ होती ती फारच मोठी झाली. पुढें मार्तंड शिंपी व मी त्या आगटीपासून विस्तव घेवून निघालों व ज्या ठिकाणीं त्यांचा मुक्काम होता तेथें आलों. आणि जवळपासच्या काडया गोळा करून शेक केला. सर्व मंडळी शेकली व तशीच झोंपी गेलीं; तों मार्तंडराव शिंपी झोपेंत दचकून उठून म्हणाला, 'अरे अरे, मला घोडयांनीं तुडविलें रे रे,' असें म्हणून तो उठला तर खरोखरच पाठीमागें व्हलम भक्ताची ( संगमनेर ) पालखी जी मागें राहिली होती ती या मुक्कामीं येऊन मिळाली. मग दोन्ही पालख्या बरोबर निघून व्हलम भक्ताची पालखी संगमनेरास गेली व आमची पालखी

शिर्डीस आलों. नियम असा होता कीं, एकदा शिर्डीहून जेजुरीस जाण्यास निघालों, म्हणजे मला उपोषण करावें लागत असे. उपोषण जरी असे, तरी मी पायीं चालत असें. उपोषणाचें पारणें कऱ्हा नदींत तळीभंडार झाल्यावर मग सोडून अन्न सेवीत असें. त्याचप्रमाणें मी पायांत जोडा घालीत नसें. मी लग्नाचाच जोडा फाडला. पुढें जोडा घातलाच नाहीं.

## २५. श्रीम्हाळसापतींच्या कुटुंबाच्या गोळ्या व बाबांची लीला

माझें कुटुंब माहेरीं होतें. त्यांच्या शरीराला एक गोळा आला होता, हें मला माहित नव्हतें. पुढें एके दिवशीं बोलतां बोलतां बाबा म्हणाले, "अरे भगत, तुझ्या औरतच्या गळ्यास गोळा आला आहे. त्याच्या योगानें तिला फार त्रास होत आहे." शिवाय ते आणखी म्हणाले, "तो गोळा मीच नीट करीन. दुसरें कोणीच करणार नाहीं." पुढें त्यांच्या सासुरवाडीहून पत्र आलें, त्यांत बाबांनीं सांगितलेला मजकूर होता. पण दुःख बरें झालें, असा मजकूर आला.

## २६. श्री. रामभाऊ लोंढे, त्यांची गाय व त्यांचे मुलगे व बाबांचें भविष्य.

कोपरगांव तालुक्यांत आस्तगांव म्हणून एक गांव आहे. तें गांव सुमारें तीन कोस लांब आहे. त्या ठिकाणचे रामभाऊ लोंढे हे दर गुरुवारीं बाबांच्या दर्शनास येत होते. ते बाबांचें दर्शन घेऊन लगेच माझें घेत. असा त्यांचा नियम पुष्कळ दिवस चालला. ते आले म्हणजे मला म्हणत कीं, "भगत, बाबा, तुम्हीं एकदा आस्तगांवास या." पण मी त्यांना उत्तर द्यावें कीं, मला येण्यास सवड नाहीं. रामभाऊ लोंढयाची गाय गाभण होती. परंतु तिचा गर्भ कांहीं वाढेना. त्यांनीं होतां होईल तितके औषधोपचार केले. परंतु गुण कांहीं येईना. शेवटीं त्यानें ती गोष्ट मला

सांगितली. व म्हणाला, " तुम्हीं हिला औषध द्या." तेव्हां मी मल्हारदेवाचें नांव घेऊन एक तोडा दिला व म्हणालों, " हा तोडा घ्या व गाईच्या शिंगास बांधा. " पुढें नऊ महिने झाल्यावर त्या गाईला कालवड झाली. ती त्यांनीं मला अर्पण केली, आणि मला म्हणाले कीं, कसेंही करून एकदा आमच्या घरांत तुमचे पाय लागूं द्या. त्यांचा आग्रह व भक्तमंडळींच्या आग्रहावरून मी बाबांची परवानगी घेण्यास गेलों. कारण मी कोठेंही बाबांच्या परवानगीशिवाय जात नसें. त्याप्रमाणें बाबांना त्यांनीं विचारलें. तेव्हां बाबा म्हणाले, " भगत, तुम्हीं आस्तगांवास जाऊं नका. कारण त्या ठिकाणीं फार भांडणें होतील." परंतु मी मित्रमंडळींच्या आग्रहावरून आस्तगांवास जाण्यास निघालों जातांना मी मल्हारीमहात्म्य ग्रंथ वाचण्यास घेतला, परंतु तेथें खरोखरच अशी गंमत झाली कीं, रामभाऊ लोंढे ह्यांचे मुलगे जेवण करण्यास बसले व सहज बोलाचालीवरून सर्वच मुलें भांडण्यास लागलीं व तें भांडण इतकें निकरावर आलें कीं, काठ्या घेऊन तीं मुलें एकमेकांस मारूं लागलीं, तेव्हां गडबड झाली. इकडे मी मल्हारीमहात्म्य वाचीत होतों. अर्थात् त्या गलबल्यांत वाचन बंद झालें व आपला ग्रंथ बगलेंत मारून मी रामभाऊ लोंढयाला रामराम करून म्हणालों कीं, तुम्ही आस्तगांवास जावूं नका; त्या ठिकाणीं भांडणें होतील असें मला बाबांनीं सांगितलें, त्याप्रमाणें झालेंच. असें बोलून मी शिर्डीस आलों व मी बाबांच्या दर्शनास मशिदींत आलों, तेव्हां मी म्हणालों, " आपण सांगितलें होतें तें अक्षरशः खरें झालें. "

## २७ श्रीम्हाळसापतींचा अपमान व बाबांचें भविष्य

मला चार मुली होत्या; त्यांपैकीं दोन मुली डोऱ्हाळ्यास दिल्या. एके वर्षी कांहीं निमित्तामुळें मला डोऱ्हाळ्याहून जेवण्यास आमंत्रण आलें होतें. त्याप्रमाणें मी आपला रोजचा देवधर्म आटोपून बाबांची परवानगी घेण्या-

त्याप्रमाणें मी थुंकलों. त्यावर काशीराम शिंप्यानें विचारलें, 'तुम्ही थुंकलां कां ? तेंव्हां मी म्हणालों, 'आज कांहीं तरी दगा होणार आहे.' इतकें बोललों व परत पोथी वाचूं लागलों. तों इकडे मजा अशी झाली कीं, खंडेरावाच्या देवळांत एक चोर शिरला आणि त्यानें माझ्या ज्या कांहीं जिनसा होत्या,त्यांची चोरी करून तो निघून गेला.इकडे मी पोथी संपल्या-वर तेथें जातों तों आपली वसावयाची सत्रंजी नाहीं, स्नानाचें भांडें नाहीं; तरी मीं त्याची पर्वा केली नाहीं. इकडे मजा अशी झाली कीं, तो चोर डोऱ्हाळ्यास गेला. त्यानें ती सर्व चोरी विकली. आणि रोकड पैसा करून घेऊन निघून गेला. पुढें ती सत्रंजी एका बाईनें धुण्याकरितां हौदावर आणिली. त्या ठिकाणीं माझी मुलगी सीताबाई ह्या पाण्यास गेल्या होत्या. ती सत्रंजी धुतल्याबरोबर तिचें पिवळे पाणी जावूं लागलें. तेव्हां सीताबाईनें विचारलें कीं, ही सत्रंजी माझ्या बापाची आहे.तूं कशी.काय आणलीस ? ती म्हणाली, 'या ग बाई, ती तर आमची आहे.' सीताबाईनीं शिर्डीस निरोप पाठविला कीं; तुमची जी सत्रंजीची चोरी झाली आहे, ती येथें आहे. इकडे मला कांहीं झोंपावयास नाहीं म्हणून मी दररोज जमिनीवर शयन करीं; पुढें स्नानाकरितां माझ्या मित्रानें एक डबा दिला होता तो पण फुटला. इतकें झाल्यावर जरी बाबांनीं मला घरीं जाण्यास सांगितलें, तरी मी जाण्यास कबूल नव्हतों. इकडे चोरीचा तपास लागला, तरी मी आपल्या जिनसा आणावयास जात नव्हतों. परंतु माझे मित्र काशीराम शिंपी यांनीं फारच आग्रह केला व मला डोऱ्हाळ्यास घेऊन जाण्याचें ठरविलें. मग मी आपल्या नियमाप्रमाणें बाबांची परवानगी मागण्यास गेलों व म्हणालों, 'बाबा, आपली जी चोरी झाली आहे, तिचा तपास लागला तर मी जाऊं का?' तेव्हा बाबा म्हणाले, 'जाऊन न जाऊन सारखेंच आहे.' परंतु मंडळीच्या आग्रहावरून मंडळी व मी डोऱ्हाळ्यास गेलों व ज्याच्या घरीं चोरी होती त्याच्या घरीं गेलों. लागलीच त्यानें सत्रंजी विकत घेतल्याचें सांगितलें. परंतु ज्यानें ती सत्रंजी विकत घेतली होती, तो गांवकऱ्यांच्या नेहमीं चोऱ्या करीत असे आणि गांवकऱ्यांनीं त्याला चोरच

करितां मशिदींत गेलों व म्हणालों, 'बाबा आज मला डोऱ्हाळ्यास जेवणास जायचें आहे, तर मी जेवावयास जाऊं का ?' तेव्हां बाबा, म्हणाले, 'नको. 'तुम्हीं आज जेवावयास जाऊं नका. कारण तुमचा अपमान होईल.' परंतु 'मंडळी माझी वाट पाहतील, तेव्हां मला जरूर जाणें आहे.' शेवटीं बाबांनीं जाण्याची परवानगी दिली. मी डोऱ्हाळ्यास गेलों. गांवाजवळ जातों तोंच मंडळी जेवण आटोपून आपापल्या घरीं जाण्यास निघाली परंतु मी आपल्या व्याह्याच्या घरीं जाऊन भेटलों आणि म्हणालों, 'बाबांनीं मला सांगितलें होते कीं तुमचा अपमान होईल,' त्याप्रमाणें झालें; मला खरोखरच यावयाचें नव्हतें. कारण तुम्हीं माझी वाट पाहात बसाल म्हणून आलों. आतां मी येतों. असें म्हणून मीं शिर्डीचा रस्ता धरला व येऊन बाबांच्या दर्शनास गेलों. तेव्हां बाबा म्हणाले, 'कशी काय झाली मजा डोऱ्हाळ्याची ती सांग पाहूं! तेव्हां मी सर्व हकीकत सांगितली.

## २८ श्रीम्हाळसापतीस पुन्हा मुलगा होण्याबद्दल व चोरीबद्दल बाबांनीं सांगितलेलें भविष्य.

मला मुली पुष्कळ होत्या. परंतु मुलगा एकच होता, तो वारला. तेव्हां मला फारच उदासीनता आली. आपल्या मंडळीचा त्याग करून खंडेरावाच्या देवळांत गेलों. तेथेंच मी आपला दररोजचा नेम चालवीं. फक्त घरीं धान्य आणून देत असें. ह्याप्रमाणें चार वर्षें झालीं. तरी मी घरीं गेलों नाहीं. तेव्हां मला बाबा म्हणाले कीं, 'आपल्या घरीं जा ना. आपला संसार पहिल्याप्रमाणें कर; तुला एका वर्षांत मुलगा होईल. माझे बोल खोटे होणार नाहींत.' त्यावर मी उत्तर दिलें कीं, झालें तें चांगलें झालें. आतां विनाकारण मायाजाळांत पाडूं नका. पुढें एके दिवशीं असें झालें कीं, मी दररोजचा नेमधर्म आटोपून घरीं धान्य पोंचवून काशीराम शिप्याच्या घरीं गेलों. त्यांच्या घरीं पोथी वाचीत असतां मध्यंतरी मला थुंकावेंसें वाटलें.

ठाविला होता. यामुळें त्यानें लागलीच सत्रंजी माझ्या स्वाधीन केली. परंतु सर्वेच जागल्यानें व पाटलानें सत्रंजी ठेवली व म्हणाले, 'भगत्, आणखी कांहीं राहिलें का ? राहिलें असल्यास सांगा. हा चोरच आहे. ह्याला आपण अटकेंत ठेवूं.' तेव्हां भगत म्हणाले, 'माझ्या सर्व जिनसा मिळाल्या, तुम्हीं त्याला अटक् करूं नका; असें मी त्यांना हात जोडून सांगितलें. इतकें म्हणून ती सत्रंजी घेतली आणि आपल्या विहिणीस देऊन टाकली आणि सर्वजण शिर्डीस आलों. पुढें संध्याकाळीं मीं शिर्डीस आल्यावर बाबांनीं विचारलें, 'कशी काय वहार झाली ?' तेव्हां मीं सर्व हकीकत सांगितली व खंडेरावाच्या देवळांत जाऊन बसलों. पुढें एके दिवशीं बाबा मला म्हणाले कीं, 'अरे, बाबा आपल्या घरीं जाना, संसार करना, तुमकु एक छोकडा हो जायगा. अरे, छोकरी झाली तर ती चिंचेप्रमाणें आहे व छोकरा झाला तर तो आंब्याप्रमाणें आहे. तूं माझ्य फकीराच्या बोलण्यावर विश्वास ठेव.' इतकें बोलले तरी मी नाहींच बोललों. शेवटीं काशीराम शिंप्यानें मला मोठ्या जुलमानें घरीं आणून बसविलें. पुढें मी संसार करूं लागलों; पुढें सहज बाबा म्हणाले, "आतां बरा बेत आहे ना ?" त्यावर मीं उत्तर दिलें, 'सागराला गंगा नदी येऊन मिळाली.'

## २९ मुलांस जपण्याबद्दल बाबांचा इषारा.

ज्या दिवशीं मी घरीं आलों, तो दिवस गोकुळाष्टमीचा होता. मी संसारास परत लागल्यापासून मला पुढच्या गोकुळाष्टमीस एक मुलगा झाला. तो दिवस रविवार होता. मी बाबांना म्हणालों, 'मी खंडेरावाचा भगत आहे हें आपणास माहितच आहे. त्याप्रमाणें त्या मुलाला शोभेल असेंच मार्तंड म्हणून नांव ठेवतों.' हेंच नांव अद्याप चालू आहे. शिवाय बाबांनीं मला सांगितलें कीं, ह्या मुलाला २५ वर्षें जप, म्हणजे झालें. तेव्हां मी म्हणालों, "बाबा आपणाशिवाय कोण जपणार ?" तेव्हां बाबा म्हणाले, 'शेतकऱ्यानें जरी शेत पेरलें, तरी त्याला तेथें हाहा करावी लागते, त्याप्रमाणें जपा; मी तर जपणारच आहें; परंतु अगोदर तुम्हीं त्याला निमित्त व्हा. त्याप्रमाणें मी मुलास २५ वर्षें जिवापाड जपलों. दरवर्षीं माझा असा नियम

होता कीं, दसरा व चंपाषष्ठी या दोन्ही सणांस निमगांव एथील खंडेरायास नैवेद्य न्यावयाचा. एका वर्षीं असें घडलें कीं, दसऱ्याच्या दिवशीं सर्व देवकर्म आटोपून घरच्या देवास नैवेद्य दाखवून व शिर्डी एथील खंडेरायाच्या देवळांत नैवेद्य पोहचवून मी घरीं आलों, व आजीस म्हणालों कीं, लवकर भर; नैवेद्य निमगांवास न्यावयाचा आहे. तेव्हां आजी म्हणाली, 'बाळा, तुला दहा दिवसांचा उपवास आहे. तुझे हातपाय गळाले असतील. शिवाय निमगांवास नैवेद्य तुझ्या चुलत्यानें नेला आहे. आतां जाण्याची जरूरी नाहीं. कारण त्यांनीं नैवेद्य दाखविला काय व आपण दाखविला काय; एकच, 'अशा प्रकारें माझी समजूत करून मला जेवण्यास बसविलें. तुम्हीं मला झालेल्या चुकीची माफी करा इतकें म्हणतों तोंच खंडेरायांची स्वारी ठिकाण्यावर गेली. लागलीच मी दुसऱ्या दिवशीं आपला रोजचा नेमधर्म आटोपून निमगांवास नैवेद्य पोंचवून मग अन्न भक्षण केलें. मी ओढ्यांत कसा गेलों हेंच मला माहित झालें नाहीं. कारण पूर्वीं गांवोगांव वेस बंद करण्याची चाल होती. त्याप्रमाणें त्या दिवशीं त्यागांवाची वेस बंद होती.

## ३० श्रीम्हाळसापतींचा स्वप्नदृष्टांत.

एकदा मी झोंपलों असतां मला एक दृष्टांत झाला कीं, माझ्या देवघरांत एकदम माझा मित्र मार्तंड शिंपी आला व लागलीच देवघरांत जाऊन देवाच्या सिंहासनावर बसला. इतक्यांत मी म्हणालों, 'अरे मार्तंड, असें कसें केलेंस ? तुला कांहीं वाटत नाहीं ? मित्र झालास म्हणून अशी गोष्ट करतोस का ?' तेव्हां मार्तंडरूपी देव मला म्हणाले, 'अरे, मी मार्तंड शिंपी नाहीं. मी जेजुरी व कडेपठाराचा मार्तंड आहे माझ्या देवळाच्याभोंवती मला ज्यांनीं त्रास दिला, त्यांना मी योग्य शिक्षा दिली. हें मी सांगण्यास आलों आहे,' असें म्हणून ते अदृश्य झाले व मी जागा झालों.

## ३१ श्रीम्हाळसापतींचे स्वप्नदृष्टांत.

मी नेहमीं देवघरांत शयन करीत असें. तेव्हां एके दिवशीं सिंहासनांतून असा आवाज आला कीं, विटेवरील देव तुझी वाट पाहात आहे. यावर मी बोललों, 'देवा माझ्यासारख्या पाप्याची विटेवरील देव कसा वाट

पाहील,हें मला समजत नाहीं. इतक्यांत आई जागी झाली,व म्हणाली, 'कां रे म्हाळसापति,तूं कोणाशी बोलतोस?' तेव्हां मीं सर्व हकीकत सांगितली व परत शयन केलें. मला पुढील दृष्टांत झाला. मी पंढरीस गेलों व दर्शनाकरितां पाळींत बसून देवळांत गेलों. परंतु मला बडवे लोक पैसे घेतल्याशिवाय आंत जाऊं देईनात. इतक्यांत काळा पटका व त्यावर पांढरे ठिपके बांधून आलेला बडवा त्यांना दिसला. मग मी त्या बडव्याला सर्व आणा देऊन दर्शन केलें, व परत शिर्डीस आलों व मी जागा झालों. पुढें मला पंढरीस जाण्याचा एकसारखा ध्यास लागला; परंतु पंढरीस जाण्याचें कांहीं तोंडचें काम नाहीं, कारण त्या यात्रेस जो खर्च लागेल,तो खर्चण्यास माझी स्थिति अनुकूल नव्हती. कारण माझा सर्व निर्वाह वारीवर होता. ह्याप्रमाणें असतां मी पंढरीचा नाद धरला व जाण्याकरितां पैसे कर्जाऊ काढण्यास नांदुर्खीस निघालों; पण माझे विचार पुढीलप्रमाणें चालले. आपण पंढरीस गेल्यावर नावेंत बसून जावें लागणार. जर कधीं नांव बुडाली, तर मग आपण बुडून जाऊं असा विचार मनांत येतो तों माझ्या पाठांतील अभंग माझ्या लक्षांत आला-''चंद्र भागे जो करी स्नान। त्याचे दोष पळती रानोरानीं त्याचा अर्थ लक्षांत येऊन आपण बुडालों म्हणजे आपणाला मोक्ष मिळेल, असें वाटून त्या भरांत मी नाचण्यास सुरवात केली. मग नांदुर्खीस पोहचलों, व गणु सोनाराच्या घरीं गेलों व म्हणालों, 'मला पंढरीस जावयाचें आहे.तर पैसे कर्जाऊ द्या किंवा कसेही द्या. तो म्हणाला, 'तुम्हीं उद्यां या म्हणजे पैसे देईन. लगेच मी घरीं आलों. दुसऱ्या दिवशीं परत गेलों. त्यानें मला पाहिल्याबरोबर सव्वा रुपया दिला. मी म्हणालों, 'मला तुमचा सव्वा रुपया पावला. तसाच मी कनकोरी एथें गुरुबहिणीकडे गेलों व तुळशी वृंदावनापाशीं बसून म्हणालों, 'मला पंढरीस जावयाचें आहे. मजजवळ तर कांहीं खर्चण्यास नाहीं. तेव्हां ती बाई म्हणाली, 'जो खर्च लागेल तो मी देतें; पण तुम्हीं एकटे जाऊं नका. पाटील आतां बाहेरून येतील त्यांना घेऊन जा. तेव्हां मी म्हणालों, 'ते येत असल्यास घेऊन जातों.' इतक्यांत पाटील बाहेरून आले. तेव्हां मी म्हणालों, 'मला पंढर-

पुरास जावयाचें आहे. तुम्हीं येतां का ? तेव्हां पाटील बरें म्हणाले. तेव्हां मी म्हणालों, 'तुम्हीं एकटे कसे येतां ? बाईला बरोबर घ्या., 'पाटलानें हो म्हटलें. मग पाटलाबरोबर आणखी बरेच लोक निघाले. दुसऱ्या दिवशीं मी सर्व मंडळींसह पंढरीस जाण्यास निघालों. तेथें पोहचल्यावर चंद्रभागेचें स्नान करून दर्शनास गेलों व तेथें वारीस बसलों. कांहीं वेळानें देवळांत गेलों, तेथें वडवे लोक तोबे मारीत होते, त्याप्रमाणें मला तोबे मारले. तेव्हां मी एक-दोन-तीन म्हणत मी जें मस्तक ठेविलें तें गरुड खांबावरून काढलें नाहीं. तोबे मारणारे लोक फारच घाबरले. त्यांनीं मला वर उचलून पाहिलें तों मी त्यांना खंडेरावांप्रमाणें दिसूं लागलों. तेव्हां ते लोक म्हणाले, 'आज खंडेराव विठोबाच्या दर्शनास आले असें म्हणून मला उचलून चरणापाशीं आणलें. तेव्हां मला देव दिसूं लागले. मी तेथें टाळ्या वाजवूं लागलों. मी पंढरीरायाचें दर्शन घेऊन आपल्या बिऱ्हाडीं गेलों. त्या वेळीं पंढरीस गंगागीरबाबांच्या दर्शनास गेलों. तेथें फारच गर्दी होती. त्यांचा सप्ताह चालू होता; इतक्यांत रात्र झाली. तेव्हां गंगागीर बाबा म्हणाले, 'कां म्हाळसापति एथें आलास, असें म्हणून एक पत्रावळी घेवून तिच्यावर दोन पत्रावळींवरील अन्न एके ठिकाणीं करून जेवण्यास बसले व त्यांनीं नेहमींच्या संप्रदायाप्रमाणें मला जेवावयास या म्हणून सांगितलें. लगेच मी मनांत शंका न आणतां त्यांच्याबरोबर जेवावयास बसलों. त्यांच्याबरोबर नगरचा एक पंढरीनाथ ब्राह्मण जेवण्यास बसला. जेवण झाल्यावर बाबा उष्टीं एका पत्रावळींवर घेवून टाकण्यास निघाले. मी म्हणालों, 'बाबा, आम्हीं टाकतो. शेवटीं जास्तच आग्रहावरून त्यांनीं मजजवळ दिलीं व मी चंद्रभागेंत टाकलीं. मग मी पंढरीची यात्रा करून शिर्डीस परत आलों.

## ३२. बाबांचें भविष्यसूचन.

एकदा निमगांव निंबोज एथील पाटलाची बाई फार आजारी होती. पुढें प्लेगची साथ सुरू झाली. त्या वेळेस बाबा एक दिवस मशिदींत व एक दिवस चावडींत झोंपत. चावडींत बाबा झोंपताना माझ्या धोतरावर झोंपत असत.

त्यांची झोंपण्याची पद्धत अशी होती कीं, एका बाजूला बाबा व दुसऱ्या बाजूला मी; म्हणजे एका धोतरावर दोघे झोंपत असूं. ज्या दिवशीं बाई फार आजारी होती, त्या दिवशीं बाबा मला म्हणाले 'आज तूं झोंप घेऊं नको. मला आज अल्लाचें स्मरण करावयाचें आहे. एवढ्याकरितां झोंप न घेतां उभ्यानें पहारा कर. कारण, आज त्या बाईला अरब रोहिल्यानीं फार मारलें आहे. तर मी अल्लाची प्रार्थना करतों.' त्याच दिवशीं रहात्याला नेवाशचे मामलेदार आले होते. त्यांना जाण्याची फार घाई होती. ते पहाटेस कोपरगांवास जाऊन बेलापुरास जाणाऱ्या गाडीनें निघाले होते. तेव्हां त्यांच्या शिपायांस वाटलें कीं, आपण अनायासें शिर्डीहून जात आहों, तर बाबांचें दर्शन घेऊन जाऊं. म्हणून ते मशिदींत यावयास निघाले. ते मशिदींत आले तोंच खुणविलें कीं, येऊं नका. शिपाई पायां पडून म्हणाले, 'आम्हाला बाबांचें दर्शन घेऊं द्या.' तेव्हां मी नको म्हणत असतां ते तसेच पायरीजवळ आले. तेव्हां मी खालीं लवून त्यांच्या हातावर उदी ठेवल्याबरोबर बाबा जागे होऊन म्हणाले, 'का रे सोनारड्या, तूं माझा केसांनीं गळा कापतोस ? हें घे तुझें धोतर असें म्हणून बाबा मला फारच बोलले. इतक्या दिवसांत आजच बाबा मला रागाच्या सपाट्यांत बोलले कीं तूं मुलांबाळांचा धनी असून तुला कांहींच समजत नाहीं. गांवोगांव काय चाललें आहे. असें असतांना तूं त्यांना कशाला येऊं दिलेंस ? नंतर बाबा मला म्हणाले, 'झाली ती गोष्ट बरी झाली. आतां चिलीम भर पाहूं. मग मी चिलीम भरून बाबांना पाजली व बाबांचा रात्रीचा नियम आटोपून मग मी पहांटेस बाबांना विचारून घरीं जाण्यास निघालों. तोंच आपल्या पहाटेच्या नियमाप्रमाणें बाबा म्हणाले, 'मला हागण आलें, माझें पोट दुखतें, दरद चालली; ह्याप्रमाणें कुण्हत रांडा चेवल्या, बडवे चेवले, तेल्याच्या घरांतून बोलली, शिव्या देत, मी त्यांना असें करीन कीं, चार घटका पाहात राहा. याप्रमाणें झाल्यावर मला सूर्योदयाच्या वेळीं उदी घेऊन आपल्या घरीं जा. दुसऱ्या कोणाच्या घरीं जाऊं नको. आतां

कधीं येशील? 'असें म्हणाले मी घरीं आल्यावर नियमाप्रमाणें बारी लागल्याने निघून नंदरामाच्या घरावरून जात होतों. तोंच निघोज निमगांवाहून उत्तरकार्याचें सामान घेण्यास मंडळी आली. ती पाहतांच रात्रीं झालेली हकीकत लक्षांत आली.

## ३३. म्हाळसापति व सडकी कुत्री.

एकदां माझ्या घरीं माझ्या वडलांच्या पुण्यतिथीच्या दिवशीं, कांहीं मंडळी जेवावयास आली ती जेवावयास बसलीं तोंच एक कुत्री आली. व दारांत उभी राहिली. ती कुत्री रोगानें सडलेली होती. मी आपल्या नेहमींच्या चालीप्रमाणें तिला पोळी टाकून जा म्हणून सांगितलें. परंतु ती तशीच उभी राहिली. तेव्हां मी काठीचा एक टोला तिला मारला. तेव्हां ती कुत्री केंकाटत निघून गेली. रात्रीं मी बाबांचा बिछाना करण्यास गेलों. बिछाना करून त्यावर बाबा निजले. मी त्यांचे पाय चेपीत होतों व जवळ दादासाहेब ( केळकर ) वगैरे मंडळीं बसलीं असतांना बाबा म्हणाले, 'कां रे म्हाळसापति गांवांत माझ्यासारखी एक सडकी कुत्री हिंडते, तिला कोणीही मारतात. हे शब्द बाबा बोलतात तोंच मला दुपारची आठवण होऊन मी झालेल्या चुकीची माफी मागून पाय चेपूं लागलों व पायावर मस्तक ठेविलें.

## ३४ बाबांचें भविष्यकथन

बाबा जेव्हां चावडींत झोंपत होते, तेव्हां बाबा चिलीम ओढीत म्हणत कीं, म्हाळसापति, ह्या ठिकाणीं माड्या-हवेल्या होतील, बाजार भरेंगा, बहुत सुभेदार आएंगा, डफेदार आएंगा, नाच होएंगा, कंचन होएंगा, नेरे चम्मन लोक आएंगा, खोरेसे पैसा ओढिंगा, हत्ती, घोडा आएंगा, शंकरनाना आएंगा, तर बंदुकीका आवाज धडांगदिशीं उडेंगा, धडांगदिशीं हा शब्द बाबा मजबरोबर म्हणत, तेव्हां जवळपास बसणारे लोक त्यांच्या बोलण्यास हंसून बाबा कांहीं तरी बोलत आहेत असें म्हणत. मी घरीं जातांना बाबांस म्हणें कीं, चलतो बापू, आज जल्दी आना. ह्यावर बाबा म्हणत कीं, जा मी येईन, तुझा सांभाळ करीन, असें दररोज म्हणत.

## ३५. बाबांचें भविष्यकथन.

असे एके दिवशीं बाबा मजजवळ म्हणत होते कीं, खंडेरायाच्या देवळांत कांहीं तरी होणार आहे. परंतु त्याचें निवारण मीच करणार आहें. तोंच दुसऱ्या दिवशीं माझा मुलगा व कुटुंब आजारी पडले. माझ्या समाचारास जी मंडळी येत, तींही आजारी पडूं लागलीं. मी बाबांना विचारीं कीं, मी औषध देऊं का ? बाबा म्हणत कीं, आपल्याला औषध नको. मग मी घरीं येऊन अंथरुणावर पडून राही. त्या वेळीं बाबा मशिदीच्या भोंवतीं फिरत व एकसारखे म्हणत कीं, ये ना पुढें; पाहूं तुझा काय पराक्रम आहे. तूं पुढें ये, म्हणजे हा पहा माझा सोटा, ह्या सोटयानें तुला चांगलाच हात दाखवीन. त्या वेळेस बाबाकडे पुष्कळ डॉक्टर येत व मी कोठें गेलों म्हणून विचारीत. त्यांना बाबांनीं सांगावें कीं, मी आजारी आहें. डॉक्टरनीं म्हणावें मी औषध देऊं का ? बाबांनीं म्हणावें द्या जा औषध; त्याप्रमाणें मला डॉक्टरांनीं औषध द्यावें व मला म्हणावें, 'हें औषध बाबांनीं घ्यावयास सांगितलें आहे.' मी तें औषध घेऊन न खातां ठेवून घ्यावें व बाबांस विचारावें कीं बाबा, मी औषध घेऊं का ? तेव्हां बाबांनीं म्हणावें औषध खाऊं नकोस.

## ३६. बाबांचें भविष्यकथन.

एके दिवशीं मी सहज टेंकून बसलों होतों, तों माझ्या दोन्ही बाजूला दोन पुरुष उभे होते व ते मला उचलणार तोंच देवघरांतून आवाज आला कीं, तुझी जोडगोळी चुकली. असें ऐकतांच माझ्या कानांत बंदुकीचा आवाज व समोरून गोळी गेल्याचा भास झाला. व जे दोन पुरुष उभे होते ते गुप्त झाले. ती गोळी एकास लागून त्या दिवशीं माझ्या स्नेहास देवआज्ञा झाली व त्या दिवसापासून माझ्या घरावरील गंडांतर नाहींसें झालें व दुसऱ्या दिवसापासून माझ्या मंडळीस आराम पडून तीं नीट झालीं.

## ३७. म्हाळसापतीस रुपये घेण्याचा बाबांचा आग्रह. म्हाळसापतींची परीक्षा.

बाबा लोकांस रुपये देत; मी ते घेत नसे. बाबा म्हणत कीं, हे रुपये घे; मी तुझें चांगलें करीन. माझ्या फकीराच्या बोलण्यावर विश्वास ठेव; माझें

तूं ऐक. बाबांनीं म्हणावें 'तुला काय पाहिजे ?' तेव्हां मी म्हणावें, 'मला आपले पाय पाहिजेत. दुसरें कांहीं नको.' एके दिवशीं मी नियमाप्रमाणें मशिदींत पूजा करण्यास गेलों. पूजा झाल्यावर मी घराकडे यावयास निघालों तोंच बाबांनीं तीन रुपये माझ्या हातावर ठेविले. त्यावर मी बोललों, 'हें काय ?' बाबा म्हणाले, 'हे तुझ्या थैलींत ठेव.' मी ते रुपये टाकून दिले. पुढें माझी मंडळी बाबांना नैवेद्य घेऊन गेली. बाबांनीं तिच्या हातांत ते रुपये दिले. त्या बाईनें ते रुपये टाकून घरीं गेली. ज्या वेळीं तिच्या हातांत रुपये दिले, त्या वेळेस मी मशिदींतच होतों. दुसऱ्या दिवशीं मी बाबांची पूजा करून घरीं जाण्यास निघालों, तोंच बाबा तीन रुपये परत देऊं लागले, तरी मी घेईना. बाबा म्हणत, 'मी तुझ्या घरीं चांगलें करीन. तुझी मंडळी झोपाळ्यावर बसवीन. चारजण तुझ्या तोंडाकडे पाहतील; माड्या हवेल्या होतील. हे रुपये तूं घे.' शेवटीं बाबांच्या आग्रहावरून मी तीन रुपये घेऊन त्यांना ब्रह्मा-विष्णु-महेश समजून त्यांची पूजा केली व ते अजून पूजेंत आहेत. एके दिवशीं मीं बाबांचा मशिदींत बिछाना केला. त्यावर बाबा झोंपले. जवळच मी झोंपलों. त्या वेळेस दोघांचा असा नियम होता कीं, एकदा झोंपल्यावर आंत कोणीही येऊं नये. त्याप्रमाणें आंत कोणीही गेलें नाहीं. त्यावर बाबा मला म्हणाले, 'जा त्या, कोळंब्यांत काय आहे तें पाहा.' मीं पाहिलें, तों मला त्यांत रुपये दिसले. तेव्हां बाबा म्हणाले, 'हे रुपये घे.' मी म्हणालों 'मला रुपये नकोत. आपले पाय पाहिजेत.'

## * ३८. बाबांचा साक्षात्कार.

पुढें एके दिवशीं बाबा वाघाच्या आसनावर बसून त्यांनीं मला सुवर्णरूप दाखविलें. तें आसन धुनीजवळ हल्लीं जो खांब आहे त्याच खांबापाशीं बाबांची नेहमीं बैठक होती, तेथें असे.

## ३९. म्हाळसापतींची पैशांच्या कामीं परीक्षा

माझ्या मुलीची सोयरीक जमली. मी कोणत्याच मुलीचा पैसा घेतला नाहीं. परंतु माझ्या नव्या सोयऱ्यांनीं त्यांच्या मंडळीजवळ

---

* श्री साईबाबा **सुवर्णरूपि** दिसल्याचा अनेकांचा अनुभव आहे असें समजतें. तर असे अनुभव श्रीचे भक्त लिहून कळवितील काय ? —**संपादक.**

४० रुपये दिले, परंतु ते मी घेईना. शेवटीं भावाच्या आग्रहास्तव ते पैसे घेऊन रांजणांत एका मडक्यांत ठेवून दिले. पुढें मी बाबांची पूजा करण्यास गेलों. तेव्हां बाबा म्हणाले, 'तुझ्या घरांतल्या रांजणांत ४० रुपये आहेत तेवढे मला दे.' मी ते रुपये काढून पाहिले. माझी मंडळी घरीं नव्हती. ती घरीं आल्यावर ४० रुपये मागितले. ते देऊं लागले. परंतु माझे भाऊ व चुलते देऊं देईनात. ते म्हणत, मला मशिदींतल्या फकीराप्रमाणें वेड लागलें. शेवटीं मी कर्जाऊ रुपये काढून बाबांस दिले.

## ४०. बाबांची अगाध लीला.

बाबांना स्वतः आत्मा ब्रह्मांडीं नेतां येत होता. मार्गशीर्ष शु॥१५ च्या दिवशीं बाबांनीं मला सांगून ठेविलें कीं, 'मी अल्लाच्या भेटीस जातों. जर मी लवकर नाहीं आलों तर माझी योग्य ती तजवीज कर. निमगांवास न जातां येथेंच बसून रहा.' हल्लीं ज्या ठिकाणीं जातें आहे, त्या ठिकाणीं बाबा अचेतन होऊन पडले. तेव्हां जवळपास बसलेली मंडळी बोलूं लागलीं, गरीब विचारा फकीर मेला रे मेला! कोणी त्यांच्या अंगावरून कोंबडें उतरून टाकलें. मी बाबांचें डोकें मांडीवर घेऊन बसलों. त्यांच्या शेवटच्या तयारीस लोक लागले. पाटीलकुलकर्ण्यांनीं कायद्याप्रमाणें पंचनामा केला. इतकें झाल्यावर बाबांची समाधी संपली व बाबांनीं आपला डावा आंगठा हालविला. पुढें कांहीं वेळानें अंगाचें कडें करून शुद्धीवर आले. बाबा मला म्हणाले 'तू बसलास का?' तेव्हां मी म्हणालों, 'असें कसें तुमचें येणें? लोकांनीं केली होतीना तुमची तयारी.' इतकें बोलून मी निमगांवास गेलों. मला बाबांनीं सांगितलें कीं, 'आजपासून तूं जमिनीला पाठ लावूनकोस.' ज्या दिवशीं सांगितलें त्या दिवशीं बाबांनीं मला बर्फी खाऊं घातली. एके दिवशीं माझें जेवण वगैरे आटोपून मी सहज भिंतीला टेकून बसलों होतों, तेव्हां माझा आत्मा एकाएकीं ब्रह्मांडीं गेला. त्यामुळें माझी जमिनीला पाठ लागली; तेव्हां माझ्या कानांत दोन मुसलमानांच्या बाया 'हाकलाई इल्लाई अल्ला' असें म्हणूं लागल्या. थोडया वेळानें माझा आत्मा जाग्यावर आल्यावर मी सुद्धा

तेंव म्हणूं लागलों. परंतु माझे पाय आखडेनात. म्हणून मुलगा व दुर्वीची मुलगी यांना पाय दाबण्यास लावलें. संध्याकाळीं मी दिवा लावण्यास गेलों. तेव्हां बाबा म्हणाले 'काय तुला काय सांगितलें होतें ? आतां परत जमिनीला पाठ लावूं नकोस.'

एकदा माझ्या घरांतील सर्व माणसें लग्नास गेलीं होतीं. परंतु माझ्या मंडळीला आग्रहानें नवरी बरोबर जाण्याची पाळी आली. इकडे लग्नाहून आलेल्या मंडळीस विचारिलें, तेव्हां त्यांनीं सर्व हकीगत सांगितली, ती मीं बाबास सांगितली. तेव्हां बाबा म्हणाले, 'मीं तुला काय सांगितलें ? कीं लग्न झाल्याबरोबर मंडळीना घेऊन ये. आतां तुझ्या मुलाला मारण्याकरितां चार मांग टपलेले आहेत. जा लवकर घेऊन ये.' लगेच मीं जाऊन मुलाला आणलें व मुलाला बाबांच्या पायांवर घातलें.

## ४१ बाबांचें भविष्यकथन

बाबा लहरींत आले असतां स्वयंपाक करीत. त्यावेळेस बाबा पुष्कळ भाज्या घेत. ते सर्व माझ्या देखरेखीखालीं करीत. बाबांनीं लसणाची टोपली घेतली. मी ती लसूण पाहिली. बाबा म्हणाले, 'तूं काय करतोस ?' तेव्हां माले-गांवचे बडे बाबा म्हणाले, 'बाबा भगत लसूण पाहातो.' बाबा म्हणाले, 'त्याचे घरीं काय फुंकनी पडली काय ? मी आपला नेमधर्म आटोपून मशिदींत गेलों. तेव्हां बाबा म्हणाले, 'आपल्या घराजवळ दोन सर्प हिंडतात तेव्हां मी घरीं येत असतांना माझ्या पायरीजवळ एक व एक कुंभाराच्या उशाखालीं सर्प निघाला तेव्हां. 'मला बाबांच्या बोलण्याचें स्मरण झालें.

## ४२ बाबांचें वस्तुस्थितीचें कथन

बाबा एक दिवस चावडींत व एक दिवस मशिदींत झोंपत. चावडींत जातांना मी बाबांचा उजवा हात धरून चाले. तेथें गेल्यावर बाबांचें अंथरूण करून चिलीम वगैरे आटोपून घरीं येई. बाबा मला म्हणत, 'तुझ्या मुलाचें लग्न कर.' पुढें माझ्या मुलाची सोयरीक जमली. नंतर साठयांनीं वगैरे मंड-ळींनीं लग्नास पैसे दिले. पुढें लग्न लावण्यास गेलों. नंतर मंडळींनीं मजपाशीं

पंगतीची भेट घातली. तेव्हां मी चिंतातूर झालों. तेथून घरीं परत आल्या-वर बाबांनीं विचारलें, 'तूं चिंतातूर कां बसला होतास ?'

### ४३ बाबांचें भविष्यकथन

एके दिवशीं बाबा मला म्हणाले, 'आज दिवाबत्ती करून ये. तुला वेशींत चोर त्रास देतील.' मला शनी वगैरे देवास दिवा लावतां-लावतां उशीर झाला. तों वेशींत खरोखरच चोर (सर्प) पाहिला. पुढें मी मंडळीस हांक मारून त्यास मारलें. नंतर मी मशिदींत गेल्यावर बाबांनीं विचारलें 'कां चोर भेटला होता का ?' मीं होय म्हणून सांगितलें.

### ४४ म्हाळसापतींची पैशासंबंधीं निरीच्छता.

चिंतामणराव हे बाबांच्या दर्शनास नेहमीं येत. त्यांना मूलबाळ नव्हतें. तेव्हां त्यांनीं मजकडून बाबांजवळ वर्दी दिली. बाबांनीं मजजवळ असें सांगितले कीं, तूं त्याना सांग कीं, तुम्ही दुसरी बायको करा. म्हणजे एक मुलगी व एक मुलगा होईल. त्याप्रमाणें त्यांचें कार्य झालें. नंतर त्यांचा एक हजार रुपयें मला देण्याचा हेतु होता. परंतु मीं ते न घेतां बाबांच्या कार्यास खर्च करण्यास सांगितलें.

### ४५ कै. काकासाहेब दीक्षितांना म्हाळसापतीकडे जाऊन बसण्यास उपदेश. बाबांना जगांत राहाण्याचा कंटाळा.

काकासाहेब दीक्षितांना बाबा सांगत कीं, मजकडे जाऊन बस. त्याप्रमाणें ते बसत. व मी त्यांना आपल्या गुह्य गोष्टी सांगे. बाबा समाधिस्त होण्याच्या आधीं म्हणत कीं, माझ्या अस्थि बोलतील. मला कंटाळा आला. येथें चोर लबाड जमलेत. तडीचे पोहणार जमले. रांडा चेवल्या, भडवे चेवले, तेल्याच्या घरांतून एक रांड बोलती, वाण्याच्या घरांतून एक रांड बोलती, उतले, मातले, मला कंटाळा आला. कोठें बाजूला पडावें ? मी इकडून घेते, इकडून देते, काय करायचं मधीमधी निवरमवी.

## ४६ बाबा समाधिस्थ होण्याची अगाऊ सांकेतिक सूचना.

एके दिवशीं रात्रीं मशिदींत बिछाना दिवाबत्ती वगैरे तयार करून नेहमीं प्रमाणें चिलीम चालली होती. तेव्हां बाबा मला म्हणाले कीं, 'मी कांहीं दिवसांनीं आतां कुठें तरी जाणार. नंतर २४ वर्षांनीं तूं ये रात्रीच्या वेळेस.' बाबा नेहमीं लोकांना म्हणत कीं जा त्या सोनारड्याला घेऊन या, असें म्हणल्यावर बाळा गुरव नेहमीं मजकडे येई. कधीं माधव फसले व बयाजी कोते हे येत. बाबा भोजन आटपून पान चिलीम मिळी लावून दांत कोरून केळकरास व इतर मंडळीस म्हणत. 'तुम्ही उदी घेऊन जा.' त्याप्रमाणें मंडळी जावयाची. नंतर बिछाना करावयाचा. विटकर व कपडे माधव फसले यानें मजजवळ द्यावयाचे. नंतर मी विटकरीवर फडके टाकून थोडीशी सरकवीत असे. त्याप्रमाणें करावयास गेलों. तों तिचे दोन तुकडे झाले. व बाबा मला म्हणाले कीं, 'ही वीट कोणी फोडली' मी म्हणालों, 'माधवानें फोडली' मग बाबा माधववर रागावले. नंतर बाबानी हात कपाळास लावून म्हणाले कीं, 'सोबत तुटली.' नंतर दुसऱ्या दिवशीं काकासाहेब वगैरे मंडळी म्हणाली कीं, आम्ही हीं वीट चांदीत मढवून आणतो. तेव्हां बाबा म्हणाले, 'तुम्ही सोन्यांत आणली तरी काय कामाची.' त्या दिवसापासून बाबा खिन्न झाले. व दहाबारा दिवसांनीं म्हणजे मिति आश्विन शु॥१० रोज मंगळवार या दिवशीं बाबांनीं देह ठेवला.

## ४७. बाबा समाधिस्त झाल्यावर म्हाळसापतीस दृष्टांत व म्हाळसापतींचें वर्तन

पुढें मंडळी जमल्यावर जातीचा वाद सुरू झाला. मुसलमान म्हणत आमच्याकडे ठेवा व हिंदू म्हणत आमच्याकडे ठेवा. मग मंडळींनीं म्हणजे बापुसाहेब बुटी, बापुसाहेब जोग वगैरे मंडळींनीं बाबांना दुसऱ्या दिवशीं स्नान वगैरे घालून त्यांची गावांतून मिरवणूक काढून वाद्य वगैरे लावून त्यांना वाड्यामध्यें समाधि दिली व चिलिम विटकर त्यांच्या उशास ठेवून दिली. दररोजच्या नियमाप्रमाणें आरती वगैरे चालली. मीं नवरात्राचे दहा दिवस व

बाबा ज्या दिवशीं गेले त्या दिवसापासून तेरा दिवसापर्यंत उपोषण केलें. मी रात्रीं व दिवसाआड मशिदींत वसत असे, तसा तेथें न वसतां १३ दिवसांपर्यंत समाधीजवळ वसत असे. पुढें नामसप्ताह चालू असतांना मला दृष्टांत झाला कीं, मी समाधीजवळ बसलों तरी पण मीं मशिदींत बसून बाबांचे चरण चेपीत आहे व इकडे नामसप्ताह ऐकतो आहे. मला झोंप नाहीं. व बाबा मला म्हणताल, 'म्हाळसापति,मी आतां काचेंत आहे बरं का.' मी बाबांच्या फोटोस चांदींत मढवून रात्रीं मशिदींत बसल्या वेळीं धोतर टाकून त्यावर फोटो ठेवीत असे.

पुढें मी निमगांवास पुजेस जात असतां वाटेंत मला मुंबईची मंडळी भेटली व ते म्हणाले कीं तुम्ही निमगांवाहून लवकर या. मी त्थिली पूजा वगैरे आटोपून परत येत असतांना अर्ध्या रस्त्यांत मी मुलास म्हटलें, 'भाऊ मार्तंड जा व आपला कोटंबा आहे, त्यात घरीं केलेला प्रसाद घे व बाबांचे पुण्यतिथीचा प्रसाद वाडयांत खाऊं घाल. भाऊ मला म्हणाला, मी कोटंबा निमगांवच्या देवळांतच विसरलों. येथें वसा. मी कोटंबा आणतों.' कोटंब्यांत पाहतों तों हात धुतल्यासारखें पाणी व भाताचीं २–३ शीतें होतीं. आम्ही तो कोटंबा घेऊन बाबांची आरती करून प्रसाद घेतला.

## ४८. श्रीअवस्थी ( कदाचित दाजीसाहेब अवस्ती असावे असावे )ची हकीकत

अवस्थी जज्ज हे बाबांच्या दर्शनास आले ते माझ्या घरीं गेले. त्यांच्याबरोबर आप्पा आचारी होता. त्यास मी सांगितलें कीं एक रुपया घे व यांना जेऊं घाल. दुसरे दिवशी मार्तंड भिक्षेस गेला. बापुसाहेब जोग यांच्या घरीं अवस्थी बसले होते. त्यांनीं त्यास हांक मारून ही घे भिक्षा म्हणून नोटांची वळकटी वावयास लागले. ती त्यानें घेतली नाहीं. त्यानें मला सर्व हकीकत सांगितली. इतक्यांत अवस्थीसाहेब येऊन म्हणाले,'मी तुमच्या मुलास दक्षणा देत असतां त्यानें घेतली नाहीं.' तेव्हां मी म्हणालों, 'बाबांच्या कार्यांत खर्च करा. ' जवळच मदर अल्ली नांवाचा एक इसम होता. तो म्हणाला,

गणपतराव नरके हे बाबांच्या दर्शनास येत, ते म्हणत कीं, माझ्या हातानें कांहीं सेवा घ्या. मग भगत केव्हां येत. त्याचप्रमाणें मेथा बाबांच्या दर्शनास आल्यावर मजकडून सेवा घ्या, असें म्हणत. परंतु भगत त्यांची सेवा घेत नसत. भक्तांचा मुलगा मार्तंडराव हे निमगांवास रजेस गेले. मागें मेथा घोंगडी घेऊन घरीं गेले.व त्यांच्या मंडळीस म्हणाले कीं,ही भक्ता-करतां आणली. परंतु त्यांनीं घेतली नाहीं. शेवटीं त्यांनी तुळशी वृंदावनावर ठेऊन निघून गेले. पूजेहून घरीं परत आल्यावर भक्तानें विचारलें तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, मुंबईच्या कोणी एका इसमानें आणली.मी नको म्हणत असतां त्यांनीं बळेंच ठेविली. तिचा उपयोग भक्तानें दर्शनास आलेल्या लोकांकडे केला, पुष्कळ मंडळी भक्ताकडे येत असत. ते भक्तांना समर्था-प्रमाणें मानीत, तेव्हां भगत त्यांना उत्तर देत कीं, मी एक समर्थांचा सेवेशीं आहें. त्यांच्या चरणासी तुम्हीं लीन व्हा म्हणजे ते तुमचें कल्याण करतील. जी इच्छा येणारे भक्त मनांत इच्छून येत, त्यांना भगत बाबांचा प्रसाद ( उदी ) व बाबांच्या स्नानाचें तीर्थ देत. हा तीर्थप्रसाद अद्याप चालू आहे. भगत नेमाप्रमाणें दिवसा आड मशिदींत जात. एके दिवशीं त्यांना असा दृष्टांत झाला कीं, तूं विडा पुजेच्या वेळेस समाधीवर ठेवतोस तो विडा काकासाहेब दिक्षीतांना देऊन त्यांना सांग कीं, बाबा तुमची कोपरगांवास वाट पाहातात. काकासाहेब भक्ताकडे दररोज येत व बाबांनीं काय सांगितलें म्हणून विचारीत. तेव्हां भक्तानें झालेला दृष्टांत त्यांना सांगितला.

## ५१ म्हाळसापतीच्या मरणाची हकीकत व निधन-तिथी

नंतर भगत भाद्रपद वद्य ४ रोज रविवार सर्व पुजाआरती वगैरे आटोपून रात्रीं मशिदींत गेले. व दुसऱ्या दिवशीं सोमवारीं स्नान, पूजा वगैरे करून त्यांनीं सांगितलें कीं, आज माझ्या वडिलांची पितृतिथी आहे तर लवकर स्वयंपाक करून घ्या. मला आज वैकुंठवासी जावयाचें आहे. लक्ष्मण ब्राह्मणास बोलावून पितृपूजा करून अगारी ( अग्नींत आहुती टाकून ) व काकग्रास, गोग्रास देऊन मंडळी

'भगत महाराज, तुम लेव दक्षणा. मी म्हणतों, तुम लेव हमकू न लगने' असें म्हणून ते रुपये त्यास देऊन टाकले. पुढें अवस्थीसाहेबांनीं मजबरोबर गोष्टी करून मी त्यांना उदीभंडार देऊन [illegible] भेटीस लागले.

### ४९. श्री. भाऊसाहेब, सौ. ताराबाई तर्खड यांची परीक्षा.

पुढें बाबांच्या दर्शनास भाऊसाहेब व सौ. ताराबाई तर्खड हे आले. मार्तंड भिक्षेस गेले तेव्हां त्यांनीं त्यांच्या हातावर रुपयाची चवली ठेवली असतां त्यानीं खालीं ठेविली तीं पुन्हा उचलून मार्तंडच्या खिशांत टाकली. व ते तेथें बसले असतां मार्तंडनें खालीं काढून ठेविली व घरीं येऊन ही हकीकत वडिलांना सांगितली. पुढें दुपारीं मी पूजेस गेलों. तेव्हां भाऊसाहेबांनीं ती रक्कम माझ्या स्वाधीन केली. मी काकासाहेबांच्या हाताशीं हात लावून ती रक्कम पेटींत टाकली. भाऊसाहेबांनीं पुष्कळ वेळां मला कपडे द्यावे. परंतु मीं ते घेतले नाहींत. भाऊसाहेबांनीं पायांत घालण्याकरितां पादुका पोष्टाने पाठविल्या. मीं घेतल्या नाहींत. त्या पुन्हा माधव फसलेच्या नांवानें पाठविल्या व त्यानें त्या मला नेऊन दिल्या त्यांचा उपयोग जेजुरीस जातांना बाळा शिंपी वगैरे मंडळींनीं केला.

### ५०. म्हाळसापतींच्या मुलानें म्हाळसापतींच्या व त्यांच्या वर्तनासंबंधीं लिहिलेली हकीकत.

एकवेळ भगत[1] पूजा वगैरे आटोपून बसले. त्यांनीं उसासा टाकला व एकाएकीं घाबरल्यासारखें करूं लागले. तेव्हां बापूसाहेब बुटी, भाटे, वगैरे मंडळींनीं त्यांना विचारलें, भगत तुम्ही असें काय करतां ? बाबांचे मंदीर तुमच्या आज्ञेप्रमाणे झालें.असें तुम्ही आम्हाला सांगा.' भगत म्हणाले, मला कांहीं एक नको. माझ्या देहाचा भंडारा पक्षी खातील. श्री सेवःशाम भगवंत रेघे हे भक्ताच्या दर्शनास येत. ते प्रेमानें भक्तांच्या पायावर दक्षिणा ठेवीत. त्यांचा भगत देवधर्मांत उपयोग करीत. भगत केव्हां घेत व केव्हां घेत नसत. अण्णासाहेब दाभोळकर बाबांच्या दर्शनास आले म्हणजे त्यांनीं सांगितल्यावरून भक्ताच्या घरीं जात.

[1] म्हाळसापती

भोजनास बसलों. त्यावेळेस भगत म्हणाले कीं, भोजन लवकर आटोपा. नंतर भोजन आटोपल्यावर पानसुपारी देऊन आपण एक विडा तोंडांत घालून थोडासा चावल्यावर त्यांनीं मानवास दिला. व अंगांत कफनी घालून मंचावर चहूंकडे डवकून जवळ असलेल्या बाळा गुरव, रामचंद्र पा. कोते वगैरे मंडळीस राम म्हणण्यास सांगितलें. व हातांतील वेताची छडी मार्तंड भक्ताजवळ देऊन सांगितलें कीं, ही तुझे जवळ ठेऊन उत्तम भक्तिभागांत काळ घालीस. मीं तुला जें कांहीं सांगितलें ते सर्व घडून येणार आहे. असें म्हणून राम म्हणून अचेतन झाले. तेव्हां रामचंद्र पा. कोते भक्तास म्हणाले आपण काकासाहेबांस आणण्यास सांगितलें त्याप्रमाणें मीं त्यांना तार केली. मग पुन्हा शुद्धीवर येऊन सांगितलें कीं, बरें आज मुक्काम करूं. उद्या मंगळवारीं जाऊं स्थिति गांवांत कळली. त्यांच्या प्रेमाची मंडळी भेटीस येऊं लागली. रात्र उजाडल्यावर सकाळीं कांहीं थोडेंसें फराळास मागितलें व बाळा गुरवास मल्हारी महात्म २२ अध्याय आहे. त्याचें पारायण करण्यास लाविलें व २२ सावा अध्याय दुसऱ्या दिवशीं समाप्त करण्यास सांगितलें तेव्हां मी ( भगतांचा मुलगा मार्तंड ) म्हणलों, तुम्हीं आज जाणार, मग उद्या समाप्ती कां? तेव्हां ते म्हणाले, तुला माहीत नाहीं. बाळा गुरवास एक रुपया देण्यास सांगितलें. काकासाहेब येते दिसेनात. रामराम सुरू केला. दादा केळकर, सगुण, सुरदास, व मला ( मार्तंड ) यांस रामराम म्हणावयास लाविलें व भक्तानें पुन्हां राम म्हणून मिती भाद्रपद व॥६ रोज मंगळवार शके १८४३ तारीख १२।९।१९२२ रोजीं देह ठेविला. पुढें त्यांची दहन व्यवस्था हार घालून दिंडीवाद्यें लावून व मिरवणूक काढून लेंडीवर केली. पुढें दहावेदिवशीं गंगेवर उत्तरकार्य विधी वगैरे करून घरीं आलों. त्यादिवशीं काकासाहेब आले. व मला बोलावून सांगितलें कीं, पुण्यतिथि करतां म्हणजे तेराव्या दिवसा करतां हे रुपये घ्या मी ते घेऊन बाळा गुरवाच्या हातानें पुण्यतिथि उत्तम प्रकारें केली. मग काका. साहेबांनीं लेंडीवर समाधी करण्याचें योजिलें. काकासाहेब ( मार्तंड भक्ताला ) मला विचारीत, कीं कांहीं दृष्टांत झाले का? भक्ताचे अनुभव आम्हांस सांगा. तेव्हां दृष्टांत सांगू लागलों.

## [illegible] स्वप्नें व [illegible]
## [illegible]

पहिल्या [illegible] भक्तानें हाक मारली. व वर्णीय [illegible] स्वप्न आलें म्हणाले [illegible] भक्ताचा हात धरून चाललों. रस्त्यांत एक नाला [illegible] पूर आला होता. त्यांतून मी मार्तंडानें हात धरून पलीकडे नेलें. व मी जागा झालों. (दुसरा) मी नेमाप्रमाणें सर्व कामें आटोपून शेजआरतीस जाई, तेथें काहीं मंडळी कुजबुजूं लागली कीं यांस अडचण असून हा दरबारांत येतो. तें मी ऐकल्यावर त्या दिवशीं शेज-आरतीस गेलों नाहीं व मी झोंपेंत असतां भक्तानें (म्हाळसापतींनीं) हाक मारिली. भाऊ ऊठ. शेजआरतीची वेळ झाली. मी उठून बसलों. व मग आरतीस गेलों. (तिसरा) मी सहामहिने अरण्यांत वास केला. धरणी-वर बसलों. दिगंबर होऊन माझ्या बैठकीचे म्हणजे आसनाचे घट्टे पाहा. आमची बहीण सौ. विठाबाई हिनें औषध लाविलें. तेव्हां त्यांनीं रागावून मलम पुसून टाकलें. मी तुमच्यांत नाहीं, दिगंबर आहें. असें म्हणून झगा व पादुका माझ्या स्वाधीन केल्या व म्हणाले मी बाबांच्या मंदिराकडे चाललों. (चौथा) भगत त्यांच्या बसण्याच्या जागेवर बसलेले होते व उत्तम प्रकारें मखर गुंफलेलें दिसलें असें स्वप्नांत पाहिलें. हें स्वप्न ऐकल्यावर समाधीचें काम काकासाहेबांनीं रामचंद्र पाटील कोते यांचेकडे रक्कम देऊन त्यांच्या देखरेखीखालीं करून घेतलें व साईबाबांच्या व भक्तांच्या पादुका केल्या. भक्तांच्या दुसऱ्या पुण्यतिथीच्या वेळीं दृष्टांत झाला कीं काका-साहेब आले व समाधी जवळ बसून मला म्हणाले भाऊ ही रक्कम पुण्य-तिथि करतां खर्च कर. घे. व बाकी पाठवून देईन असें ऐकून जागृत झालों. आणि दुसऱ्या दिवशीं त्यांचें पत्रच आलें. त्याप्रमाणें काकासाहेब हयात होते तों पर्यंत पुण्यतिथि करीत. पुढें त्यांच्या कांहीं मनांत होतें, परंतु त्यांचा अंत झाल्यामुळें तसेंच राहिलें. श्री समर्थ साईबाबा त्यांच्यावर पूर्ण कृपा करोत.

शिरडी. }  मार्तंडभाऊ म्हाळसापति सोनार.
१८-१०-३४ }  श्रीक्षेत्र शैलधी (शिरडी)

### [illegible]

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याच्या अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदलेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधी पत्रव्यवहार आमच्याकडे करावा.

४ लेखासंबंधी पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी

वार्षिक वर्गणी टपालखर्चासह मनिऑर्डरनें आगाऊ रु. २।≈, व्ही. पी. नें रु. २॥, फुटकळ अंक ।≈, मागील अंकास शिल्लक असल्यास ॥-

व्यवस्थापक—श्रीसाईलीला

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाच्या दोन्हीं बाजूंस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंती अगर नापसंती कळविली जाईल. पसंती कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमच्याकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक श्रीसाईलीला